
मंगळवार, ३ जानेवारी २०२३
# राम प्रहर
◆ वर्ष १५ ◆ अंक १६६
www.ramprahar.com
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

आजपासून रायगडात पोलीस भरती प्रक्रिया/२
मुरूड पालिकेसमोर कोळी समाज आंदोलन करणार/७
आज भारत-श्रीलंका पहिला टी-२० सामना/८

## हॉकी वर्ल्डकपसाठी भारतीय संघाची घोषणा




**नवी दिल्ली :** ओडिसामध्ये होणाऱ्या पुरुष हॉकी विश्वचषक स्पर्धेसाठी भारतीय संघाची सोमवारी (दि. २) घोषणा करण्यात आली. वर्ल्डकपसाठी १८ खेळाडूंचा समावेश असलेल्या या संघाची निवड करण्यात आली आहे. भारताचे नेतृत्व ड्रॅगफ्लिकर हरमनप्रीत सिंग करणार आहे, तर अमित रोहिदास हा संघाचा उपकर्णधार असेल. बंगळुरू येथील दोन दिवसीय निवड चाचणी शिबिरानंतर संघाची घोषणा करण्यात आली आहे. या चाचणीत ३३ खेळाडूंना आजमावून पाहण्यात आले. यानंतर अनुभवी आणि युवा खेळाडूंचा समतोल साधत १८ जणांचा अंतिम संघ निवडण्यात आला आहे. भारतीय संघ येत्या १३ जानेवारीपासून स्पेनविरुद्ध खेळून आपली मोहीम सुरू करणार आहे. ग्रुप 'ऊ'मध्ये भारतासह इंग्लंड, स्पेन आणि वेल्स या संघांचादेखील समावेश आहे.

# 'मविआ'च्या माध्यमातून भ्रष्टाचाराची दुकाने

### भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांची टीका

**चंद्रपूर : प्रतिनिधी**

महाविकास आघाडीच्या माध्यमातून उद्धव सेना, काँग्रेस व राष्ट्रवादी अशी भ्रष्टाचाराची तीन दुकाने उघडली गेली आहेत. सत्तेसाठी विचारांशी तडजोड करणाऱ्या अशा लोकांना माफी नाही, अशी जोरदार टीका भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी सोमवारी (दि. २) येथे केली. ते विजय संकल्प जाहीर सभेत बोलत होते.



भाजपच्या वतीने आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तयारी सुरू करण्यात आली आहे. या सभेला मंत्री सुधीर मुनगंटीवार, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर, खासदार अशोक नेते, रामदास तडस, आमदार संजीव रेड्डी, डॉ. रामदास आंबटकर, बंटी भंगाडिया आदी उपस्थित होते.

या वेळी नड्डा म्हणाले, शौर्य व विरतेसाठी ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्रात हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेंचे पुत्र उद्धव ठाकरे यांनी केवळ मुख्यमंत्रिपदाच्या लालसेपोटी भाजपच्या पाठीत खंजीर खुपसला. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेससमोर माथा टेकता टेकता ठाकरे यांचा माथाच झुकला आहे. तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने केवळ पैसा ओरबाडण्याचे काम केले. याच भ्रष्टाचारामुळे राज्यातील दोन मंत्री कारागृहात गेले. त्यातील एक माजी मंत्री नुकतेच कारागृहातून सुटून बाहेर आले, तर दुसरे कारागृहात अजूनही शिक्षा भोगत आहेत.

### अर्थव्यवस्था मजबूत

ज्या ब्रिटनने आपल्यावर २०० वर्षे राज्य केले, मंदीच्या काळात त्याच ब्रिटनला मागे टाकून भारत आजघडीला जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था झाला आहे. सद्यस्थितीत अमेरिका, रशिया हे देश महागाईचा सामना करीत आहेत, मात्र भारत महागाई आटोक्यात आणून अर्थव्यवस्थेचा मजबूत पाया रचत आहे. जगातील अनेक अर्थव्यवस्था कोलमडत असताना पंतप्रधान नरेंद्र मोदींमुळे आपली अर्थव्यवस्था मजबूतपणे पुढे वाटचाल करीत आहे, असे भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा म्हणाले.

## नोटबंदी वैधच! मोदी सरकारच्या निर्णयाचे सुप्रीम कोर्टाकडून समर्थन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

मोदी सरकारने २०१६ साली घेतलेल्या नोटबंदीच्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी (दि. २) निकाल देत सरकारची ही कृती योग्यच असल्याचे म्हटले आहे.



### विरोधातील सर्व याचिका फेटाळल्या

केंद्र सरकारच्या नोटबंदीच्या निर्णयाला आव्हान देत एकूण ५८ याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या होत्या. या याचिकांवरील सुनावणीदरम्यान दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकून घेतल्यानंतर न्यायालयाने आपला निकाल राखून ठेवला होता. त्यानंतर सोमवारी यावर निकाल देत नोटबंदीचा निर्णय वैध असल्याचे म्हटले आहे. केंद्र सरकारने घेतलेला नोटबंदीचा निर्णय घटनाबाह्य नाही, असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले आहे. न्या. एस. ए. नाझीर यांच्या अध्यक्षतेखालील पाच सदस्यांच्या घटनापीठाने या प्रकरणावर ४:१च्या बहुमताने निकाल दिला.

### छत्रपती संभाजीराजेंबद्दल अवमानजनक विधान

# खोपोली भाजपतर्फे अजित पवारांचा निषेध



(छाया : जयवंत माडपे)

**खोपोली : प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीराजे हे धर्मवीर नव्हते असे अवमानजनक विधान राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी केले आहे. त्यांच्या निषेधार्थ सोमवारी (दि. २) खोपोली भारतीय जनता पक्ष, महिला मोर्चाच्या वतीने दीपक चौकात निषेध आंदोलन करण्यात आले. या वेळी छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयजयकाराच्या घोषणा देण्यात आल्या.

महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात भाजपचे खोपोली शहराध्यक्ष इंदरमल खंडेलवाल, सरचिटणीस सुनील नांदे, प्रमोद पिंगळे, चिटणीस गोपाळ बावस्कर, महिला मोर्चा शहर अध्यक्ष शोभा काटे, सरचिटणीस अश्विनी अत्रे, अपर्णा साठे, कामगार आघाडी संयोजक सूर्यकांत देशमुख, युवा मोर्चा शहराध्यक्ष अजय इंगुलकर, महिला मोर्चा जिल्हा कोषाध्यक्ष रसिका शेटे, सदस्य स्नेहल सावंत, माजी नगरसेविका अपर्णा मोरे, सुमिता महर्षी, रक्षा मालोदे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## उरणमध्ये आग; २० दुकाने खाक

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील जेएनपीए बंदराजवळ असलेल्या स्पीडी कंपनीशेजारील दुकानांना सोमवारी (दि. २) रात्री १.३०च्या सुमारास अचानक आग लागली. या आगीत २०हून जास्त दुकाने भस्मसात झाली आहेत.

जेएनपीए प्रशासनाने ३० वर्षांपूर्वी स्थानिक भूमिपुत्रांना रोजगाराचे साधन उपलब्ध व्हावे या दृष्टिकोनातून सोनारी ग्रामपंचायत हद्दीत स्पीडी कंपनीच्या बाजूला व्यवसायासाठी जागा उपलब्ध करून दिली. या दुकानांवर त्या कुटुंबांचा उदरनिर्वाह अवलंबून होता.

(सविस्तर वृत्त पान ३ वर..)

# नागोठणे बंदला शंभर टक्के प्रतिसाद

**नागोठणे : प्रतिनिधी**

सतत होणारे धर्मांतर, लव्ह जिहाद आणि मुरूड येथील प्रकरणातील आरोपी मोकाट फिरत असल्याच्या निषेधार्थ नागोठणे विभाग सकल हिंदू समाज बांधवांच्या वतीने सोमवारी (दि. २) शहर बंदची हाक देण्यात आली होती. या बंदला अत्यावश्यक सेवा वगळता १०० टक्के प्रतिसाद लाभला.



(छाया : राज वैशंपायन)

मुरूड येथील चंदन जैन यांचा काही दिवसांपूर्वी अकस्मिक मृत्यू झाला होता. या पार्श्वभूमीवर या संदर्भात सकल हिंदू बांधव समाज नागोठणे पंचक्रोशी यांनी रायगड पोलीस अधीक्षकांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, चंदन जैन यांना स्नायूंचा आजार होता. आरोपी मंजर महमदअली जुईकर (रा. नागोठणे) व चंदन जैन यांची पत्नी पायल हे चंदन यांना झोपेच्या गोळ्या देऊन त्यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरले. याबाबत चंदन यांची बहीण पुष्पा गांधी यांनी मुरूड पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. आरोपी मंजर जुईकर व पायल जैन यांच्यात झालेला मोबाईलवरील संवाद, संपर्क तसेच गुगलवर सर्च केलेले झोपेच्या गोळ्यांचे परिणाम, मृताचे पोस्टमार्टेम होणार नाही याविषयी झालेला संवाद आदी अनेक पुरावेही त्यांना मिळाल्याचे गांधी यांनी तक्रारीत म्हटले आहे. (पान २ वर..)

## निवडक

### मुंबई-जोधपूर एक्स्प्रेसचे डब्बे घसरून १० प्रवासी जखमी

**जयपूर :** राजस्थानच्या पाली येथे मुंबई-जोधपूर सूर्यनगरी एक्स्प्रेसचे आठ डब्बे रुळावरून घसरल्याची घटना सोमवारी (दि. २) मध्यरात्री साडेतीनच्या सुमारास घडली. या अपघातात १० प्रवासी जखमी झाले आहेत. रेल्वेचे अधिकारी, कर्मचारी घटनास्थळी पोहचले. जखमींना जवळच्या सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

### पंजाबच्या मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थान परिसरात बॉम्ब

**चंदिगड :** पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांच्या चंदिगड येथील निवासस्थान परिसरात जिवंत बॉम्ब आढळला आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलीस तसेच बॉम्बशोधक पथक या परिसरात दाखल झाले. मिळालेल्या माहितीनुसार ज्या ठिकाणी बॉम्ब आढळला तेथून पंजाब आणि हरियाणा अशा दोन्ही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांचे निवासस्थान जवळच आहे. याबाबत पुढील कार्यवाही सुरू आहे.

# गव्हाण प्रीमियर लीग रंगली

### आमदार प्रशांत ठाकूर यांची सदिच्छा भेट



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आई एकविरा स्टार्स व भावार्थ नाखवा ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने गव्हाण प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचे आयोजन रविवारी (दि. १) करण्यात आले होते. या स्पर्धेला भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत खेळाडूंना प्रोत्साहित केले.

गव्हाण येथील पाटणे मैदानात गव्हाण प्रीमियर लीग रंगली. या वेळी भाजप महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत, वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, भाजप तालुका चिटणीस जयवंत देशमुख, युवा नेते निलेश खारकर, प्रमोद कोळी, विनायक कोळी, सुयोग कोळी, प्रशांत कोळी, रोशन कोळी, आकाश कोळी, सचिन कोळी, सुधीर कोळी, योगेश कोळी, स्वप्नील कोळी, आदेश कोळी, ऋतुराज कोळी, मिलिंद कोळी, सुरज कोळी, मंगेश कोळी, अविनाश कोळी, सुहास कोळी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, खेळाडू आणि क्रिकेटप्रेमी उपस्थित होते.

# पनवेलमध्ये उपसरपंच निवडणुकीतही भाजपची बाजी

### तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी दिल्या शुभेच्छा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यात नुकत्याच झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने १०पैकी सहा ठिकाणी झेंडा फडकविला आहे. त्याचप्रमाणे सोमवारी (दि. २) झालेल्या उपसरपंच निवडणुकीतही भाजपने बाजी मारली. पदभार स्वीकारलेल्या शिवकर, नेरे व चिंध्रण येथील सरपंच व नवनिर्वाचित उपसरपंच तसेच सदस्यांचे भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



शिवकर ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी आनंद ढवळे, नेरे ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी प्रकाश घाडगे, तर चिंध्रण ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी एकनाथ पाटील हे थेट नागरिकांमधून निवडून आले आहेत. या सर्व सरपंचांनी सोमवारी आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला. उपसरपंचपदाच्या निवडणुकीतही भाजपने यश प्राप्त केले आहे. त्यानुसार शिवकर ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी संतोष मते, नेरे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचदी निलिमा निलेश पाटील, तर चिंध्रण ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी सुजित नामदेव पाटील यांची निवड झाली आहे.

या वेळी भाजपचे तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, उपाध्यक्ष संजय पाटील, माजी पं. स. माजी सदस्य भूपेंद्र पाटील, ओबीसी मोर्चा जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, काळुंद्रे विभागीय अध्यक्ष अनेष ढवळे, भाजप नेते शिवाजी दुर्गे, माजी सरपंच राजश्री म्हसकर, वासुदेव गवते, युवा नेते रोशन पाटील, माजी ग्रामपंचायत सदस्य एकनाथ पाटील, नेरे ग्रामपंचायत सदस्य राम पाटील, दिनेश मानकामे, शैलेश जाधव, वंदना रोडपालकर, कल्पना वाघे, (पान २ वर..)

## कर्जतमध्ये हुतात्म्यांना अभिवादन; मशाल मिरवणूक

**कर्जत : प्रतिनिधी**

हुतात्मा वीर भाई कोतवाल आणि हुतात्मा हिराजी पाटील यांच्या बलिदान दिनानिमित्त सोमवारी (दि. २) कर्जतमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. हुतात्मा स्मृती समितीच्या वतीने कर्जत शहरात मशाल मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर हुतात्म्यांना अभिवादन करण्यात आले.




(छाया : विजय मांडे)

कर्जतच्या टिळक चौकात हुतात्मा बलिदान दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास इतिहास संशोधक वसंत कोळंबे, माजी नगराध्यक्ष राजेश लाड तसेच ॲड. गोपाळ शेळके, ॲड. संतोष जोहेकर, राहुल किसवे, विवेक पाटील, प्रशांत मराडे, अध्यक्ष राकेश डगले, सचिव विशाल कोकरे, कृष्णा पवार, सागर मंडलिक, गणेश गायकवाड, प्रवीण जाधव, गणेश मंडलिक संतोष पवार, अरुण थोरवे, विश्वनाथ मंडलिक, मनीषा बैकर आदी उपस्थित होते.

या वेळी क्रांतिज्योत प्रज्ज्वलन, सिद्धगडहून आणलेल्या मृतिकेचे पूजन आणि हुतात्मांना अभिवादन करण्यात आले. यानंतर शहरातून मशाल मिरवणूक काढण्यात आली.

# रामबागमध्ये संगीतमय कार्यक्रम उत्साहात

### मान्यवरांसह रसिकश्रोत्यांची उपस्थिती







**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दुबईच्या धर्तीवर पनवेल तालुक्यातील न्हावेखाडी येथे उभारण्यात आलेल्या माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर उद्यान अर्थात रामबागमध्ये नवीन वर्षानिमित्त रविवारी (दि. १) लाईव्ह म्युझिकल इव्हेंट या सुरेल गाण्यांची मैफिल असलेल्या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यास रसिकश्रोत्यांचा प्रतिसाद लाभला.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली निसर्गसौंदर्याचे केंद्रबिंदू बनलेली रामबाग फुलली असून उलवे नोड, नवी मुंबई, पनवेल, उरण तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील नागरिकांनी वीकेण्डला आपल्या परिवारासह वेळ घालवण्यासाठी रामबागला पसंती दिली. (पान २ वर..)

## 'रयत'मार्फत उद्या खासदार शरद पवार यांचा कृतज्ञता समारंभ

**सातारा : प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या ८२व्या वाढदिवसानिमित्त अभीष्टचिंतन आणि त्यांच्या रयत शिक्षण संस्थेतील ५० वर्षांच्या सुवर्णमयी वाटचालीनिमित्त कृतज्ञता समारंभाचे आयोजन संस्थेच्या वतीने बुधवारी (दि. ४) दुपारी २ वाजता करण्यात आले आहे.



सातारा येथील जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण बहुउद्देशीय सभागृहात खासदार श्रीनिवास पाटील यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या समारंभास ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्याचप्रमाणे संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य व राज्याचे माजी गृहमंत्री आमदार दिलीप वळसे-पाटील, संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, जनरल बॉडीचे सदस्य हणमंतराव गायकवाड, चेअरमन डॉ. अनिल पाटील, व्हाईस चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे हे मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास शिक्षणप्रेमी, विद्यार्थी, सेवक यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर यांनी केले आहे.

# आजपासून रायगडात पोलीस भरती

## संपूर्ण मैदानात सीसीटीव्ही कॅमेरे



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील पोलीस भरतीला मंगळवारपासून (दि. ३) अलिबागेत पोलीस मुख्यालयात सुरुवात होणार आहे. ही भरती प्रक्रिया २२ जानेवारीपर्यंत सुरू राहील. पोलीस शिपाई पदाकरीता १९,१७६ तर चालक पोलीस शिपाई पदांकरीता ६४७ उमेदवारांनी अर्ज केले आहेत. भरती प्रक्रिया पारदर्शक व्हावी व कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी संपूर्ण मैदानात सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहेत, अशी माहिती रायगड पोलीस अधीक्षक सुधाकर घार्गे यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत दिली. अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे तसेच इतर अधिकारी या वेळी उपस्थित होते.

पोलीस शिपाईची २७२ पदे व चालक पोलीस शिपाई सहा पदांकरीता ही भरती प्रक्रिया होणार आहे. ८१ पदे ही महिलांसाठी आरक्षित आहेत, तर पाच टक्के पदे खेळाडूंसाठी आरक्षित आहेत. पोलीस शिपाई पदाकरीता पुरूष उमेदवारांचे १५,९४९ व महिला उमेदवारांचे ३,२२७ असे एकूण १९,१७६ आवेदन अर्ज प्राप्त झालेले आहेत, तर चालक पोलीस शिपाई या पदाकरीता पुरूष उमेदवारांचे ६२४ व महिला उमेदवाराचे २३ असे एकूण ६४७ आवेदन अर्ज प्राप्त झालेले आहेत. पोलीस शिपाईच्या २७२ पदांमध्ये पोलीस भरती बंदोबस्ताकरीता ५३ पोलीस अधिकारी ३६७ पोलीस अंमलदार व २७ मंत्रालयीन कर्मचारी असे मनुष्यबळ तैनात करण्यात आले आहेत.

सोमवारी रोजी पोलीस मुख्यालय, अलिबाग येथे पोलीस भरती बंदोबस्ताची रंगीत तालीम करण्यात आली. या पोलीस भरतीच्या वेळी उमेदवारांची बायोमॅट्रिक पडताळणी करण्यात येणार असून भरती प्रक्रियेदरम्यान संपूर्ण मैदान सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या निगराणीखाली राहणार आहे. प्रत्येक इव्हेंटचे व्हिडीओ रेकॉर्डिंग करण्यात येणार आहे. प्रत्येक इव्हेंटसाठी विशिष्ट अधिकारी नियुक्त करण्यात आला आहे. उमेदवारांची राहण्याची व्यवस्थाही पोलीस प्रशासनामार्फत करण्यात आली आहे. एकाच दिवशी उमेदवारांच्या शारीरिक चाचणी व प्रमाणपत्र पडताळणी पूर्ण केली जाणार आहे.

**पोलीस भरती प्रक्रिया ही निपक्षपातीपणे पार पडणार असून कोणत्याही गैरप्रकाराला यामध्ये थारा देण्यात येणार नाही. संपूर्ण मैदानात सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहेत . साध्या वेशातील पोलीस तैनात करण्यात आले आहेत. कोणतीही व्यक्ती भरती करून देण्याचे अमिष दाखवून पैशांची मागणी करीत असल्यास किंवा आर्थिक गैरव्यवहाराचा संशय आल्यास तत्काळ पोलीस अधिक्षक कार्यालय (०२१४१) २२८४७३, २२२०२८ येथे संपर्क साधावा.**

**–सुधाकर घार्गे, पोलीस अधीक्षक रायगड**

# फेसबुकच्या माध्यमातून मैत्री करून चोरी

## ■ महिलेला मानपाडा पोलिसांकडून अटक
## ■ २० लाख ८१ हजारांचा मुद्देमाल जप्त



**पनवेल : वार्ताहर**

फेसबुकच्या माध्यमातून लोकांशी संपर्क साधून त्यांचा विश्वास संपादन केल्यानंतर त्यांचेकडील सोन्याचे दागिने, मोबाईल फोन अशा वस्तू चोरी करणाऱ्या महिलेस मानपाडा पोलिसांनी अटक केली आहे. या महिलेकडून पोलिसांनी एकूण २० लाख ८१ हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

या घटनेतील फिर्यादी महेश कृष्णा पाटील यांची फेसबुकचे माध्यमातून समृद्धी खडपकर (वय २९) या महिलेशी ओळख झाली. महिलेने त्यांना खोणीगांव येथील एका हॉटेलमध्ये जेवण करण्यास बोलाविले. हॉटेलमध्ये गप्पा मारताना तिने त्यांचेवर प्रेम करते असे दाखवून त्यांचा विश्वास संपादन केला व त्यास लॉजचे खोलीत घेऊन गेली. फिर्यादी हे बाथरुममध्ये गेले असता महिलेने त्यांचे परवानाधारक रिव्हॉल्व्हर, सॅमसंग फोल्ड–३ मोबाईल, सोन्याच्या तीन चेन, हातातील सोन्याचे कडे, एक टायटन कंपनीचे घड्याळ असा एकूण चार लाख ७५ हजार रुपये किमतीचा ऐवज घेऊन पळ काढला. या महिलेचा कोणताही मोबाईल फोन नंबर अथवा तिचा पत्ता महेश यांच्याकडे नव्हता. महेश यांनी मानपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

घटनेचे गांभीर्य ओळखून मानपाडा वरिष्ठ पोलीस निरीक्षक शेखर बागडे यांनी गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना सूचना केल्या. महिलेचा शोध घेतला असता, ती गोवा येथे असल्याचे समजले. पोलिसांनी गोवा येथून समृद्धी खडपकर हिला ताब्यात घेतले. तिच्याकडे अधिक चौकशी केली असता, तिने अश्याप्रकारे अनेक नागरिकांना गंडा घातल्याची कबुली दिली, तसेच या चोरलेल्या वस्तू तिचा साथीदार बाजारात विकत असल्याचे सांगितले.

याप्रकरणी मानपाडा पोलिसांनी गोवा येथून तिचा साथीदार विलेंडर विल्फड डिकोस्टा (वय ३४) याला ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून १६ मोबाईल फोन, दोन घड्याळे, २९० ग्रॅम सोन्याचे दागिने असा एकूण २० लाख ८१ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

# रोह्यात अजित पवारांविरोधात भाजपचे जोडे मारो आंदोलन



**धाटाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे आराध्यदैवत धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल चुकीचे वक्तव्य करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्याविरोधात जोडे मारो आंदोलन सोमवारी (दि. २) रोहा नगरपालिकेसमोर दक्षिण रायगड युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमित घाग यांनी नेतृत्वाखाली करण्यात आले.

या वेळी अजित पवार हाय हाय, या अजित पवारांचं करायचं काय खाली डोकं वरती पाय, धर्मवीर संभाजी महाराज की जय अशा घोषणा देण्यात आल्या.

या वेळी रोहा तालुका युवा मोर्चाध्यक्ष महेश ठाकुर, विलास डाके, वैभव कुलकर्णी, संकेत मोरे, धीरज मोंढे, विनोद मोरे, दिनेश सुटे, नामा वाळंज, दिनेश पंदेरे यांसह भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# रायगड जिल्हाधिकारी डॉ. कल्याणकर यांची कोकण विभागीय आयुक्तपदी पदोन्नती

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**



रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांची कोकण विभागीय आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

रायगडच्या जिल्हाधिकारी पदी ऑगस्ट २०२१मध्ये नियुक्त झालेल्या डॉ. कल्याणकर यांच्याकडे मागील काही महिन्यांपासून कोकण आयुक्तपदाचा जादा भार सोपविण्यात आला होता. त्यानंतर पदोन्नतीच्या प्रतीक्षेत असलेल्या डॉ. कल्याणकर यांची शासनाने पदोन्नती करण्यात आली आहे.

डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी आपत्कालीन परिस्थितीत खंबीरपणे उभे राहून रायगडकरांचे पालकत्व स्वीकारले होते. जनसामान्यांचे प्रश्न त्यांनी तत्काळ सोडविले होते, तर कोरोना कालावधीत त्यांनी अनेकांना मदतीचा हात दिला होता. २००७च्या बॅचचे आयएएस अधिकारी असणारे डॉ. महेंद्र कल्याणकर कामगार आयुक्त म्हणून कार्यरत होते, त्यानंतर रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी म्हणून योग्य भूमिका बजावली आहे.



**पनवेल : चिंध्रण ग्रामपंचायतीचे नवनिर्वाचित भाजप सरपंच एकनाथ पाटील आणि बिनविरोध निवड झालेले उपसरपंच सुजित पाटील यांचे भाजपचे तालुका खनिजदार शिवाजी दुर्गे, नरेश सोनावणे, एकनाथ मुंबईकर, रवींद्र पाटील आदींनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

# उरण तालुक्यातील नऊ उपसरपंच बिनविरोध

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

तालुक्यातील १८ ग्रामपंचायतींच्या उपसरपंचपदाची निवडणूक सोमवारी (दि. २) झाली. सरपंचाच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या निवडणुकीत नऊ ग्रामपंचायतींमध्ये बिनविरोध तर नऊ ग्रामपंचायतींमध्ये एकापेक्षा जास्त अर्ज असल्याने त्या ठिकाणी निवडणूक घेण्यात आली.

सारडे ग्रामपंचायतींमध्ये दोन्ही उमेदवारांना समसमान मते मिळाल्याने सरपंचांच्या कास्टिंग मतांवर उपसरपंचपदी उमेदवाराची निवड झाली.

पाणजे ग्रामपंचायतीत विलास पाटील, डोंगरी अभिषेक घरत, घारापुरी बळीराम ठाकूर (बिनविरोध), रानसई सुरेश पारधी (बिनविरोध), पुनाडे उषा तांडेल, सारडे जीवन पाटील, नवीन शेवा कुंदन भोईर (बिनविरोध), धुतुम कविता पाटील (बिनविरोध), करळ मेधा ठाकूर (बिनविरोध), कळंबुसरे सारिका पाटील, बोकडविरा गौरव ठाकूर, वशेणी जयंत म्हात्रे, पागोटे सुजित तांडेल (बिनविरोध), पिरकोन राजश्री म्हात्रे (बिनविरोध), जसखार प्रणाली म्हात्रे (बिनविरोध), चिर्ले राजन घरत, भेंडखळ संगीता भगत, नवघर दिनेश बंडा (बिनविरोध) यांची उपसरपंचपदी निवड करण्यात आली.

# नवी मुंबई महापालिकेत लोकशाही दिन

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात सोमवारी (दि. २) लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले. या वेळी अतिक्रमण विभागासंबंधी एक निवेदन प्राप्त झाले होते. अर्जदार व संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.

फेब्रुवारी महिन्याचा लोकशाही दिन ६ फेब्रुवारी रोजी होणार असून अर्जदारांनी आपला अर्ज दोन प्रतींमध्ये २० जानेवारीपर्यंत आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचे नावे लोकशाही दिनाकरीता अर्ज असे दर्शनी भागी ठळकपणे नमूद करून सादर करावयाचे आहे, असे आवाहन करण्यात येत आहे.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे तुरमाळे, ता. पनवेल, जि. रायगड येथील जमीन मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भोगवटाधारकाचे नाव | सर्व्हे न. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर. पॉ.) |
|---|---|---|---|---|
| तुरमाळे ता. पनवेल | न्यामुलहक अजीज शहा | ३७ | २/अ/१ | ०–३०–० |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, दान, साठेकरार, कुळ, वहिवाट, लिज, इजमेंट, हूकूमनामा, दरखास्त, दावा, वारसाहक्क वगैरे इतर कोणत्याही प्रकारच्या हरकती असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपली लेखी हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासहीत खालील सही करणार यांचेकडे रजि. पोस्टाने अथवा समक्ष दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास वरील मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून सदरचे मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व उशीरा येणा–या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

ता. ०२/०१/२०२३
पनवेल

**सही/–**
**ॲड. नितेश भरत घोडविंदे.**
**१३५, नगरपालिका कॉम्प्लेक्स**
**ता. पनवेल, जि. रायगड**
**मोबाईल : ९५९४१५६३८३**


पान १ वरून

## नागोठणे बंदला शंभर टक्के प्रतिसाद

आरोपी मंजर जुईकरने नागोठणे पंचक्रोशीतील हिंदू मुलीशी विवाह केला होता व त्यांना दोन अपत्येही आहेत. त्यानंतर मंजरने मुरूड येथील चंदन जैन यांचा संपत्तीसाठी खून केला. आरोपी मंजरची पार्श्वभूमी ही गुंडगिरी आणि अरेरावीपणाची आहे हे आम्हा नागोठणेवासीयांना अनेकांना अनुभवास आलेले आहे.

पोलिसांकडून आरोपींवर लावण्यात आलेले ३०४ व ३४ हे कलम सौम्य असून त्यांच्यावर मनुष्यवधाचे ३०२ व ३२८ हे कलम लावून तत्काळ अटक करावी व कठोरातील कठोर शिक्षा करण्यात यावी. आरोपी मोकाट सुटल्यास आपले गुन्हे लपविण्यासाठी इतरांना धोका पोहचविण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचेही निवेदनात म्हटले असून याच्या निषेधार्थ आम्ही स्वयंस्फूर्तीने आमची दुकाने बंद ठेवत असल्याचे बोलताना सांगितले.

दरम्यान, बंद काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी नागोठणे पोलीस ठाण्याचे निरीक्षक राजन जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली बंदोबस्त ठेवण्यात आला होता. बंद शांततेत पाळला गेला.

## पनवेलमध्ये उपसरपंच निवडणुकीतही भाजपची बाजी

महादू पाटील, सुनील पाटील, दीपक पाटील, गोटीराम म्हात्रे, दता भगत, संतोष चोरघे, विद्याधर चोरघे, सखाराम कलोते, हरिश्चंद्र जाधव, श्रीकांत गवते, अच्युत गवते, सागर पाटील, भरत काकडे, पांडुरंग भगत, अमित गवते, सुजय पाटील, जगदिश म्हसकर, मिलिंद पाटील, संजय पाटील, भाई गवते, सतीश घाडगे, किशोर खारके, माजी उपसरपंच सुजित पाटील, गणपत कडू, एकनाथ मुंबईकर, तुषार दुर्गे, नरेश सोनावणे, हरिश्चंद्र पाटील, राजेंद्र पाटील, रामदास पाटील, यदुनाथ पाटील, चंद्रकांत पाटील, चंद्रकांत पाडेकर, गुरूनाथ पाटील, पी. एम. पाटील, संतोष देशेकर, अरुण पाटील, रोहिदास पाटील, सुरेश मुंबईकर, अभिमन्यू पाटील, रूपेश मुंबईकर, उदय पाटील, लक्ष्मण कडू, प्रकाश पाटील, प्रवीण मानकामे, भालचंद्र गाडगे, मोतीराम टेंभे, नामदेव पाटील, विश्वास पाटील, रूपेश पाटील, राकेश कडू, भानूदास पाटील, विनायक मानकामे, तुषार पाटील, आकाश कडू, यशवंत कदम, किसन पाडेकर, के. एस. कडू, हिरामण पाटील, प्रकाश गडगे, हरिश्चंद्र गडगे, शंकर मुंबईकर, अमित कडू, माथा पाटील, चंद्रकांत ढवळे, भास्कर पाटील, मारुती पाटील, मनोहर ढवळे, आंबो ढवळे, गोटीराम ढवळे, तुकाराम टोपले, भरत पाटील, तुकाराम तुपे, गोपाळ पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, या वेळी शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे आणि सदस्यांची ग्रामस्थांच्या वतीने ढोल ताशाच्या गजरात भव्य मिरवणूक काढण्यात आली.





## रामबागमध्ये संगीतमय कार्यक्रम उत्साहात

दुबईच्या वाळवंटात मिरॅकल गार्डन फुलले. त्याचप्रमाणे न्हावेखाडी येथील चिखलमय जमिनीवर भव्यदिव्य आणि सर्वांगसुंदर रामबाग फुलली आहे. १४ एकर जागेतील या रामबागेत विविध प्रकारची फुलझाडे, तलाव, विद्युत रोषणाई, पदपथ, चिरेबंदी बांधकाम, आसन व्यवस्था, खेळणी, पाळणे, डबल हर्ट आणि स्टोन असे दोन सेल्फी पॉईंट, मचवा, पाण्याचे कारंजे अशा सर्व बाबी निसर्गप्रेमींना आकर्षित करतात. सायंकाळी विद्युत रोषणाई डोळ्यांचे पारणे फेडते. त्याचबरोबर वाहन पार्किंग, सुरक्षा अशा विविध पायाभूत सुविधा या ठिकाणी असल्याने हजारो नागरिक येथे भेट देऊन मनमुराद आनंद घेत आहेत.

नववर्षाच्या पहिल्याच दिवशी या मनमोहक रामबागमध्ये संगीतमय कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. रसिकश्रोत्यांनी त्यास प्रतिसाद दिला. त्याचप्रमाणे सुप्रसिद्ध डॉ. गिरीश गुणे यांनी परिवारासह या उद्यानाला भेट दिली. या वेळी पनवेल महापालिकेच्या माजी उपमहापौर सीताताई पाटील, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, मंदिर कमिटी अध्यक्ष सी. एल. ठाकूर, न्हावे ग्रामपंचायतीचे सदस्य सागर ठाकूर, ज्येष्ठ कार्यकर्ते अरुण ठाकूर आदी उपस्थित होते. नववर्षाची सुरुवात नयनरम्य रामबागमध्ये संगीतमय कार्यक्रमाने झाल्याने उपस्थित नागरिकांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आभार मानले.


## सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पनवेल तालुका यांचे समोर

**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पहिला मजला कृषी उत्पन्न बाजार समिती, सहकार मार्ग, रायगड बाजाराच्या बाजूला पनवेल जि. रायगड ४१०२०६**

**महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० चे कलम १०१ खाली दावा नोटीस**

दि पनवेल को–ऑपरेटीव्ह अर्बन बँक लि. पनवेल ता. पनवेल जि. रायगड या बँकेने या कार्यालयाकडे महाराष्ट्र सहकारी कायदा अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये खालील व्यक्तीं विरुध्द थकीत कर्जाचा भरणा केला नसल्याचे नमुद करून वसुली प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे..

त्यानुसार या कार्यालयात वेळोवेळी सुनावणी ठेवण्यात आली, तथापि खालील नमुद व्यक्तींना सुनावणी नोटीसची पोहोच होत नसल्याने नैसर्गिक न्याय तत्वानुसार म्हणणे दाखल करण्यासाठी जाहीर नोटीस देण्यात येत आहे या जाहीर नोटीसीद्वारे आपणास पुन्हा एक संधी देण्यात येत असून सदर दाव्याबाबत अंतीम सुनावणी ०९/०१/२०२३ रोजी सकाळी ११.३० वाजता ठेवण्यात आली असून सदर सुनावणीस आपण स्वतः वा आपले प्रतिनिधी मार्फत उपस्थित राहावे आपण गैरहजर राहिल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याचा निकाल दिला जाईल व त्यानंतर आपले कोणतेही म्हणणे ऐकून घेतले जाणार नाही.

| अ.क्र. | दावा क्रमांक | कर्जदार/सहकर्जदार | पत्ता | थकीत कर्ज |
|---|---|---|---|---|
| १ | ४५/२०२२ | श्री. संतोष बाबू शेरीगर (सौ. नेहा अनुप किरनळी या कर्जदाराचे जामिनदार) | घर नं. २५३–२–अ, २, वार्ड नं. ३३, बंदर रोड, ता. पनवेल, जि. रायगड ४१० २०६ | २,५८,५८६/– |
| २ | ४६/२०२२ | श्री. अंकुश गोपीनाथ पवार (श्री. राजु बबन राठोड या कर्जदाराचे जामिनदार) | मु. पो. दापोली, ता. पनवेल, रायगड ४१० २०६ | ३,१७,६९४/– |

जावक क्रमांक, ०००१/२०२३
दिनांक – ०२/०१/२०२३

शिक्का

**सही/–**
**सहायक निबंधक**
**सहकारी संस्था, पनवेल, जि. रायगड**

# उरणमध्ये २० दुकाने आगीत खाक

## साहित्य भस्मसात; मोठे नुकसान

**उरण : बातमीदार, प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील जेएनपीए बंदराजवळ असलेल्या व सोनारी ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या स्पीडी कंपनीशेजारी असलेल्या दुकांनांना रविवारी (दि. १) रात्री १.३० च्या सुमारास अचानक आग लागली. लागलेल्या प्रचंड आगीमूळे तब्बल २० दुकाने आगित भस्मसात झाली.

दुकांनांना लागलेल्या आगीमुळे दुकानातील संपूर्ण साहित्य भस्मसात झाल्याने दुकानधारकांवर बेकारीची कुहाड कोसळली असून या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे. जेएनपीए प्रशासनाने ३० वर्षांपूर्वी स्थानिक भूमीपुत्रांना रोजगाराचे साधन उपलब्ध व्हावे या दृष्टीकोनातून स्पीडी कंपनीच्या बाजूला त्यांना जागा देऊन त्यांना दुकान चालविण्यास दिले. या दुकानामूळे या कुटुंबाचा निर्वाह या स्टॉलवरच अवलंबुन होता, आता मात्र हे उदरनिर्वाहाचे साधनच नष्ट झाल्याने आता उदरनिर्वाहाचे कोणतेच साधन उपलब्ध नसल्याने खूप मोठे दुःखाचे डोंगर त्यांच्यावर कोसळले आहे.

नुकसानग्रस्तांना जेएनपीए प्रशासनाने आर्थिक मदत करावे. त्यांचे पुनवर्सन करावे अशी मागणी सोनारी ग्रामसुधारणा मंडळाचे अध्यक्ष राकेश कडू यांनी जेएनपीए प्रशासनाकडे केली आहे. नेमकी आग कशामुळे लागली याचा अधिक तपास पोलीस प्रशासनातर्फे सुरु आहे. आग लागल्याचे समजताच तलाठी येऊन त्यांनी जागेचे व नुकसानाचे पंचनामे केले.

आग लागल्याचे समजताच घटनास्थळी माजी सरपंच महेश कडू, सोनारी अध्यक्ष राकेश कडू, सरपंच पूनम कडू आणी सदस्य तसेच सामाजिक कार्यकर्ते विकास कडू यांनी भेट देऊन पाहणी केली.



जेएनपीएकडुन प्रकल्पग्रस्तांना हे दिलेले स्टॉल असून २४ पैकी २० स्टॉल जळून खाक झाले आहेत. ५ बाय १२ आकाराचे हे स्टॉल होते. सर्व दुकाने एकमेकांना लागून असल्याने तसेच दुकाने ३० वर्षांपूर्वी फायबरने बनविलेले होते. त्यामुळे आसपास एखाद्या सिलेंडरचा स्फोट होऊन आग लागली असेल, असे काही नागरीकांचे म्हणणे आहे.

**आगीत आमच्या दुकानाचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले असून आम्हाला आर्थिक नुकसान भरपाई मिळावी यासाठी आम्ही जेएनपीए प्रशासनाकडे मागणी केली आहे. झालेल्या नुकसान भरपाई व दुर्घटना संदर्भात आम्ही न्हावा शेवा पोलीस ठाणेशीसुद्धा संपर्क साधला आहे. आम्हाला प्रशासनाने न्याय द्यावा ही आमची विनंती आहे.**

**-दत्तात्रेय कडू.**
**नुकसानग्रस्त पीडित**



पनवेल : रयत शिक्षण संस्थेच्या आबासाहेब मराठे आर्ट्स ॲण्ड न्यू कॉमर्स, सायन्स कॉलेज राजापूर येथील प्राचार्य डॉ. घनश्याम हराळे आणि प्राचार्य डॉ. संजय मेस्त्री यांनी सोमवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेतली.



पनवेल : नवीन वर्षानिमित्त ज्येष्ठांचे आशीर्वाद घेण्याची परंपरा आहे. त्यानुसार विविध क्षेत्रातील व्यक्तींनी दरवर्षीप्रमाणे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले व नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप युवा नेते रोशन पाटील, संतोष पाटील, धनंजय पाटील आदी उपस्थित होते.





पनवेल : भाजपचे करंजाडे विभागीय अध्यक्ष कर्णा शेलार यांच्या ६०व्या वाढदिवसानिमित्त अभीष्टचिंतन कार्यक्रम करंजाडे येथे आयोजित करण्यात आला. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शेलार यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. भाजप जिल्हा सरचिटणीस विनोद साबळे, करंजाडे ग्रामपंचायत सरपंच मंगेश शेलार, कार्यकर्ते प्रकाश खैरे आदी या कार्यक्रमाला उपस्थित होते.

## निवडक

### दगडाने ठेचून महिलेची हत्या

**पनवेल :** नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी तालुक्यात धक्कादायक घटना घडली आहे. भिंगारगाव भेर्लेवाडी येथील एका महिलेची हत्या करण्यात आली आहे. पनवेल तालुक्यातील भिंगारगाव भेर्लेवाडी येथील ४५ वर्षीय तारा आनंदा कातकरी या महिलेची अज्ञात व्यक्तीने दगडाच्या साह्याने तिचे हत्या केली. याप्रकरणी तालुका पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासंदर्भात पोलीस अज्ञात आरोपीचा शोध घेत आहेत.

### मोटरसायकलची चोरी


**पनवेल :** जेएनपीटी ते पळस्पे महामार्गावर पार्क केलेली मोटरसायकल अज्ञाताने चोरून नेल्याने या प्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदानंद भोडू भोईर (वय ३४) यांनी त्यांच्या मालकीची लाल रंगाची होन्डा यूनिकॉर्न मोटरसायकल (एमएच ०६ सीई ४५८०) ज्याची किंमत ५० हजार रुपये इतकी आहे. ती जेएनपीटी ते पळस्पे महामार्गावर पारगांव गावाचे हद्दीत पार्क केली होती. या वेळी अज्ञात व्यक्तीने ती चोरून नेली. या प्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मातीचा ढिगारा उचलला

## भाजपच्या विक्रांत पाटील यांचा पाठपुरावा

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक विक्रांत पाटील यांच्या पाठपुराव्याने नवीन पनवेल सेक्टर ३ मधील मातीचा ढिगारा उचलण्यात आला.



प्रभाग १८ मधील नवीन पनवेल सेक्टर ३ मध्ये स्टील मॅन सोसायटी समोरील असलेल्या उद्यानालगत अनेक दिवस मातीचा ढिगारा पडला होता व याला कचराकुंडीचे स्वरूप येत चालेले होते. याबाबत सूचना विक्रांत पाटील यांच्याकडे आल्या होत्या. कर्तव्यदक्ष माजी नगरसेवक विक्रांत पाटील यांनी त्वरित महापालिका अधिकाऱ्यांशी संपर्क साधून नागरिकांना त्रासदायक ठरत असलेल्या मातीचा ढिगारा उचलण्यास सांगण्यात आले.

अधिकाऱ्यांनी सकारत्मक प्रतिसाद देत मातीचा ढिगारा उचलून घेतला. माजी नगरसेवक विक्रांत पाटील हे नेहमी तत्परतेने समस्या सोडवतात याबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

# रसायनी ब्राह्मण संघ अध्यक्षपदी पत्रकार भालचंद्र कुलकर्णी



**रसायनी : प्रतिनिधी**

रसायनी येथील ब्राह्मण संघाचे अध्यक्ष म्हणून आपटा येथील पत्रकार भालचंद्र कुलकर्णी यांची सर्वानुमते या वर्षासाठी निवड करण्यात आली आहे. या वेळी या वर्षात विविध कार्यक्रम आयोजित करणे महीलाचा सहभाग वाढवणे रायगड जिल्ह्यातील सर्व ब्राह्मण संघाचे काम पहाणे विविध समाज उपयोगी कार्यक्रम आयोजित करणे, असे ठरविण्यात आले आहे.

या वेळी माजी अध्यक्ष उदय पिंगळे, डॉ. कुलकर्णी, डॉ. विदुला सोमण, संध्या कुलकर्णी, प्रतिभा बोडस, विनय सोहनी, अभ्यंकर गुरुजी जोशी गुरुजी, वैदेही जोशी, समीर कुलकर्णी, सुनील सोमण, आदित्य सोमण, अनिल सोमण, अनंत भालेराव, आनंद दातार, कोशे, धनंजय जोशी, अनिरुद्ध बागूल, प्रवीण दातार, विजय जोशी, सदाशिव जोशी, सुभाष देशपांडे, पत्रकार अनील भोळे, नागेश कदम, अमीत पळणीटकर, सुधीर काणे, मनोहर कुलकर्णी, मृणाल कुलकर्णी, शरद पुणतांबेकर आदींनी अभिनंदन केले आहे व पुढील कामासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# पाले बुद्रुकमधून महिला बेपत्ता

**पनवेल : वार्ताहर**

तालुक्यातील पाले बुद्रुक गावामध्ये राहणारी विवाहित महिला पनवेल शहरामध्ये जाऊन येते असे सांगून घराबाहेर पडली मात्र परत घरी न परतल्याने ती हरवल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

काजल तेजस तांडेल (वय २६) असे या महिलेचे नाव असून तिची उंची पाच फूट, रंग गोरा, केस लांब, डोळे काळे असून अंगात पिवळा ड्रेस तसेच पायात चप्पल घातलेली आहे. या महिलेबाबत कोणाला काही माहिती असल्यास पनवेल तालुका पोलीस ठाणे (२७४६४३३३) किंवा पोलीस हवालदार मंगेश भूमकर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# उरण महाविद्यालयात एनएसएसचे श्रमसंस्कार शिबिर

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील विद्यार्थ्यांचे विशेष निवासी श्रमसंस्कार शिबिर दिघोडे येथे झाले.

संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदिपचंद्र श्रृंगारपुरे हे उद्‌घाटनीय कार्यक्रमाचे अध्यक्ष होते तर प्रा. डॉ. विनायक पवार हे उद्‌घाटक होते. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. बळीराम एन. गायकवाड यांच्या मागदर्शनाखाली झालेल्या या सात दिवसीय शिबिरात, ग्रामच्छता अभियान, प्रबोधनात्मक रॅली, इंडस्ट्रीयल सहल, पर्यावरण जागृती अंधश्रध्दा इत्यादी मुद्यांवर भर दिला गेला. त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी योगा, प्रार्थना तसेच विविध तज्ञ व्यक्तिंची विविध विषयांवरील व्याख्याने आयोजित केली गेली.

समारोप कार्यक्रमात कृतीका ठाकूर हिने सात दिवसांच्या कार्याचा अहवाल वाचन केला तर मनिषा शर्मा, नियती पानसरे, राज भोईर व आयुष कोळी यांनी अनुभव कथन केले. संचालन प्रचिती माळी तर पाहुण्यांचे स्वागत व परिचय आदिती पाटील हिने दिला. या वेळी के. ए. शामा व रमेश ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महेश गावंड, वैष्णव पाटील, महाविद्यालयातील सर्व महिला शिक्षक व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. दत्ता हिंगमिरे संबंध शिबिराच्या यशस्वीतेसाठी मेहनत घेतली.



# आंबेडकरी अनुयायांचे पनवेलमध्ये स्वागत

**पनवेल : वार्ताहर**

कोरेगाव भीमा शौर्य दिनाच्या पार्श्वभूमीवर कोरेगाव भीमा इथे विजय स्तंभास अभिवादन करण्यासाठी दरवर्षी लाखो आंबेडकर अनुयायी या ठिकाणी येत असतात. शौर्यस्तंभाला अभिवादन करणासाठी निघालेल्या आंबेडकरी चळवळीतील नेत्यांचे स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी पनवेल येथे गेस्ट हाउसजवळ स्वागत केले.

याचप्रमाणे भिमा कोरेगाव येथे झालेल्या स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाच्या जाहीर सभेला उपस्थित राहत शेकडो कार्यकर्त्यांना महेश साळुंखे यांनी पक्षाच्या आगामी वाटचालीविषयी मार्गदर्शन केले.

दरम्यान, महेश साळुंखे यांच्या उपस्थितीत रायगड जिल्हा परीषदेच्या वडघर शाळेच्या मुख्याध्यापिका माधुरी मधुकर चौधरी यांचा सेवानिवृत्तीचा कार्यक्रम झाला. या वेळी शाळा कमिटी अध्यक्ष चंद्रकील कोबडे, उपाध्यक्षा सोनाली महेश साळुंखे तसेच सर्व शिक्षकवृंद, पालकवर्ग, शाळा कमिटी सदस्य उपस्थित होते.

# मोहोपाडा बाजारपेठेत गर्दीच गर्दी

## अरूंद रस्त्यांवर विक्रेत्यांचे बस्तान



### खरेदीसाठी ग्राहकांची वर्दळ

**या बाजारपेठेत ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणात ग्राहक वर्ग खरेदीसाठी येत असतो. या बाजारात कपडे व शोभेच्या वस्तू शहरातील अन्य दुकांनापेक्षा कमी किंमतीत मिळत असल्याने महिलांसह नागरिक आठवड्याचा माल खरेदी करत असतात. त्यामुळे या बाजाराला तालुक्यातून महत्त्व आले आहे. मोहोपाडा प्रवेशद्वाराच्या मुख्य रस्त्यावरच आठवडा बाजाराची जागा असल्याने या रस्त्यावरून वाहनांची रेलचेल सुरुच असते.**

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पाताळगंगा परिसराची मुख्य बाजारपेठ असलेल्या मोहोपाडा शहरात दर रविवारी आठवडा बाजार तुडुंब भरत असून या बाजारात रसायनी व आसपासच्या परिसराच्या ग्रामीण भागातील नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी दिसून येते. मोहोपाड्याचे रुपांतर शहरीकरणाकडे झपाट्याने होत आहे. तर येत्या वर्षांत नगर परिषद होण्याचे विश्वसनीय संकेत मिळत आहेत. अरूंद रस्ता, वाहतूक कोंडी व काही भाजी विक्रेत्यांनी रस्त्यावर मांडलेले बस्तान अशा अनेक समस्यांमुळे मोहोपाडा बाजारपेठेचा श्वास गुदमरला असून बाजारपेठेतील गर्दीमुळे चालणे कठीण बनले आहे.

बाजारपेठेतून प्रवास करताना तारेवरची कसरत करावी लागत असून रविवारी बाजारपेठ खचाखच भरते. फळे विक्रेते, कापड विक्रेते, भाजी विक्रेते तळ ठोकून बसलेले असतात. त्यामुळे खरेदी करण्यासाठी आलेल्या नागरिकांना बाजारपेठेतून बाहेर पडताना धावपळ करावी लागत असल्याचे चित्र पहावयास मिळते. कापड दुकान, बांगड्या, साहित्य, खाद्यपदार्थ, भांडी व शोभेच्या वस्तू या बाजारात स्वस्त मिळत असल्याने रसायनीकर गर्दी करतात. या बाजारात कापड दुकानांसह अन्य मालाची अनेक दुकाने दिसून येतात.

मोहोपाडा आठवडा बाजारातील जागेचे नियोजन केल्यास दुकानदारांना सोयीचे होईल. बाजारातील माल स्वस्त मिळत असल्याने परिसरातील रिस, कांबे, चांभार्ली, आकुळवाडी, रिसवाडी, सावळे, जुनी पोसरी, गुळसुदे, आपटा, कासप, कैरे, वाशिवली, लोहोप आदी गावातील नागरिक येतात.

# फडके महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

म. ए. सो. संस्थेच्या आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके विद्यालय, नवीन पनवेल, इंग्रजी माध्यम या शाळेचा २३वा वार्षिक स्नेह संमेलन व पारितोषिक वितरण सोहळा झाला. विद्यालयाच्या प्रांगणात अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात झालेल्या या कार्यक्रमाला प्रसिद्ध नेत्रतज्ञ डॉ. सुहास हळदीपूरकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

या वेळी बोलताना डॉ. हळदीपूरकर म्हणाले, गेल्या अनेक वर्षांपासून मी विद्यालयाचा प्रवास प्रत्यक्ष पहिला असून पनवेल परिसरातील उपक्रमशील शाळा म्हणून फडके विद्यालयाचे नाव घेतले जाते. मुलांच्या आरोग्यसंपन्न जीवनशैलीचे अवलंबन कसे असावे याबद्दल उपस्थित विद्यार्थी व पालकवर्गाला त्यांनी मार्गदर्शन केले.



या कार्यक्रमात महाराष्ट्रातील विविध प्रकारची लोकनृत्ये सादर करण्यात आली. धनगरी नृत्य, जोगवा, मंगळागौर, वाघ्या-मुरळी, पोवाडा, कोळीनृत्य, दिंडी, अभंग, लेझिम असे विविध प्रकारचे नृत्याविष्कार सादर करून विद्यार्थी कलाकारांनी सोहळ्याची रंगत वाढविली.

विद्यालयाच्या प्रमुखानी या कार्यक्रमाबाबत माहिती देताना सांगितले, शालेय विद्यार्थ्यांमधे आत्मविश्वास व सांघिक भावना वाढावी तसेच महाराष्ट्रातील सांस्कृतिक परंपरांची ओळख लोककलेच्या माध्यमातून रुजवावी यासाठी या उद्देशाने हा कार्यक्रम झाला. शालेय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता फडके विद्यालयामध्ये असे विविध प्रकारचे संस्कारक्षम कार्यक्रम आयोजित केले जातात.

## संपादकीय

# नोटाबंदी योग्यच!

काळा पैसा जमविणाऱ्यांना तसेच देशविघातक कृत्ये करणाऱ्या दहशतवाद्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऐतिहासिक नोटाबंदी करून दणका दिला होता. पंतप्रधानांनी जाहीर केलेल्या निर्णयानंतर तत्कालीन चलनी नोटा बंद होऊन कालांतराने नव्या नोटा बाजारात आल्या. हा निर्णय योग्यच होता हे सर्वोच्च न्यायालयाने अधोरेखित केले आहे.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ८ नोव्हेंबर २०१६ रोजी जनतेला संबोधित करीत नोटबंदीचा निर्णय जाहीर केला होता. या निर्णयाद्वारे एका झटक्यात पाचशे आणि एक हजार रुपये मूल्य असलेल्या नोटा व्यवहारातून बाद करण्यात आल्या. पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेण्याआधीच नरेंद्र मोदींनी 'न खाऊंगा, ना खाने दुंगा,' असा स्पष्ट नारा दिला होता. २०१४मध्ये भाजपला पहिल्यांदा बहुमत मिळून मोदी पंतप्रधानपदी विराजमान झाल्यानंतर त्यांनी काळ्या पैशांविरोधातील मोहीम वेगाने व व्यापक प्रमाणात सुरू केली. भ्रष्टाचाराची पाळेमुळे खणून काढण्यासाठी पंतप्रधान मोदींनी डिजिटल व्यवहारांना पसंती देण्यास सुरुवात केली. नोटाबंदी हा त्याचाच एक महत्त्वपूर्ण भाग होता. विकसित देशांमध्ये डिजिटल व्यवहारांना प्राधान्य दिले जाते. फार कमी व्यवहार तिथे रोखीने होतात. त्यामुळे त्याची नोंद होऊन पारदर्शकता राहते. शिवाय या माध्यमातून शासनाचा महसूल बुडत नाही. नेमके हेच पंतप्रधान मोदींना देशात अभिप्रेत होते. गैरमार्गाने जमविला गेलेला काळा पैसा उद्‌ध्वस्त होऊन छोटे व्यावसायिक व सर्वसामान्यांना दिलासा मिळावा यासाठी नोटाबंदीचा सर्जिकल स्टाईक करण्यात आला. त्याचप्रमाणे चलनात बनावट नोटांचा सुळसुळाट झाला होता. नकली नोटांचा मोठ्या प्रमाणात वापर करून फसवणूक केली जात होती. ती रोखण्यासाठी नोटाबंदीचे अस्त्र लागू पडले. विशेष म्हणजे दहशतवादी आणि नक्षलवादी कारवायांना पायबंद घालण्यासाठी त्यांची आर्थिक रसद ठप्प करणे आवश्यक होती. नोटाबंदीतून ती साध्य झाले. या निर्णयामुळे देशविघातक कृत्य करणाऱ्यांना मोठा दणका बसला. सर्वोच्च न्यायालयानेही या निर्णयाचे समर्थन करीत विरोधात दाखल झालेल्या ५८ याचिका फेटाळून लावल्या आहेत. न्या. एस. ए. नाझीर यांच्या अध्यक्षतेखालील पाच सदस्यांच्या घटनापीठाने या प्रकरणावर सोमवारी ४:१च्या बहुमताने निकाल दिला. नोटबंदीचा निर्णय घटनाबाह्य नाही, असे सुप्रीम कोर्टाने म्हटले आहे. नोटाबंदीच्या निर्णयात कोणतीही चूक नाही. त्यामुळे हा निर्णय मागे घेता येणार नाही, असेही सुप्रीम कोटार्ने स्पष्ट केले आहे. नोटाबंदी हे बेहिशेबी संपत्तीच्या विरोधातील पाऊल असल्याचे तेव्हाच मोदी सरकारने स्पष्ट केले होते. या निर्णयामुळे काळा पैसा बाहेर आला. शिवाय भारताची अर्थव्यवस्था कॅशलेस होण्यास मदत झालीच. त्याचबरोबर कर संकलनात भर पडल्याचे दिसून आले. यापूर्वी अनेक जण करचुकवेगिरी करीत होते. आताही ती काही प्रमाणात होत असते, मात्र पूर्वीच्या तुलनेत ती नक्कीच कमी झाली आहे. मोदी सरकारने आर्थिक धोरणात आमूलाग्र बदल केले आहेत. यामध्ये प्रामाणिकपणे कमाई करून वेळच्या वेळी कर भरणाऱ्याला अभय आहे, मात्र बेहिशोबी मालमत्ता, काळा पैसा, करचुकवेगिरी, भ्रष्टाचार करणाऱ्यांचे काही खरे नाही. सरकार वेळोवेळी याबाबत वेगवेगळे निर्णय घेत असते. सरकारच्या या पारदर्शी भूमिकेला व कारभाराला न्यायव्यवस्थेने समर्थन दिले आहे. म्हणजेच सरकार करीत असलेली कृती योग्यच असल्याचे कायदेशीरदृष्ट्याही सिद्ध होते.**

# महाआरोग्य योजना, सार्वजनिक आरोग्य योजना



(भाग-५)

आरोग्य सेवांचा मूळ उद्देश आरोग्य सुधारणे हा असून लोकांचे जीवनमान सुधारावे व निरोगीपणे जगता यावे यासाठी, आरोग्य शिक्षण व सेवा यावर भर देण्यात आला आहे. आरोग्य सेवा ही सामाजिक आरोग्य क्षेत्र, यात प्राथमिक आरोग्य सेवा, उपकेंद्र, ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, जिल्हा रुग्णालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांचाही समावेश होतो. या माध्यमातून लोकांना आरोग्य सेवांची उपलब्धता करून देण्यात येते. सामान्य माणूस केंद्रस्थानी ठेवून शासनाच्या वतीने त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने विविध योजना आखण्यात आलेल्या आहेत. या आरोग्य सेवा अधिकाधिक लोकाभिमुख झाल्यास लोकांना चांगले आरोग्य लाभून समाजाचे आरोग्य सुधारण्यासाठी नक्कीच मदत होऊ शकते.

सामाजिक क्षेत्राबरोबरच स्वयंसेवी संस्था व खाजगी क्षेत्र या माध्यमातून अंगीकृत रुग्णालयातून आपल्या सेवा या देत असतात, त्या सेवांशीही शासन सामाजिक आरोग्य क्षेत्राशी जोडण्याचा प्रयत्न करीत आलेले आहे. निरोगी महाराष्ट्राच्या दृष्टीने विविध महाआरोग्य योजना सामान्य माणसासाठी शासनाच्या वतीने साकारलेल्या आहेत. या लोककल्याणकारी योजनांची माहिती देऊन लोकांनी त्याचा अधिकाधिक उपयोग घेण्यासाठी व त्या लोकाभिमुख करण्यासाठी शासनाचा प्रयत्न आहे, यासाठी सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत त्याचप्रमाणे सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे यांचेदेखील मोलाचे मार्गदर्शन मिळत आहे, असे मनोगत आरोग्य सेवा आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, मुंबईच्या संचालक, डॉ. साधना तायडे तसेच आरोग्य सेवा, पुणेचे संचालक, डॉ. नितीन अंबाडेकर यांनी नोव्हेंबर-२०२२च्या महाराष्ट्र आरोग्य पत्रिकेच्या महाआरोग्य योजना-सार्वजनिक आरोग्य योजना व कार्यक्रम या विशेषांकातून व्यक्त केले आहे. या पुस्तिकेचे संपादन डॉ. कैलास बाविस्कर यांनी केले आहे.

चला तर जाणू घेऊया काय आहेत या आरोग्य योजना, काय आहेत या योजनांचे लाभ.

**क्षयरोग निर्मूलन कार्यक्रम** :

निदान : राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार क्षयरोगाचे निदान करण्यात येते. नवीन निदान झालेल्या क्षयरुग्णांमधील औषधांची संवेदनशीलता तपासण्याकरिता सीबीनॅट, लाईन प्रोबअँसे, लिक्विड, सॉलिड कल्चर या चाचण्या राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत करण्यात येतात.

उपचार पद्धती : राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार नवीन निदान झालेल्या औषधी संवेदन व औषधीविरोधी क्षयरुग्णांना उपचार देण्यात येतात. कार्यक्रमातंर्गत निदान झालेल्या क्षयरुग्णांना त्यांच्या वजनानुसार उत्तम दर्जाचे क्षयविरोधी औषधी उपचार पूर्ण होईपर्यंत अखंडित पुरविण्यात येतात. क्षयरोग पथकामधील वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत क्षयरुग्णांचे उपचार पूर्ण होण्याकरिता सतत त्यांची देखरेख व पर्यवेक्षण करण्यात येते. कार्यक्रमांतर्गत निदान झालेल्या औषधविरोधी क्षयरुग्णांना मार्गदर्शक सूचनांनुसार क्षयविरोधी औषधांचे उपचार सुरू करण्यात येतात.

औषधोपचार : राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत निदान झालेल्या सर्व क्षयरुग्णांना औषधोपचार पूर्ण करण्याच्या दृष्टीने कर्मचाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली/ सहकार्याने मोफत औषधी दिली जाते. डीबीटी लाभ : डीबीटी अंतर्गत लाभ महाराष्ट्र राज्यात १ एप्रिल २०१८पासून क्षयरुग्णांना निष्क्रीय पोषण-आहार योजनेंतर्गत दरमहा ५०० रुपये क्षयरुग्णांच्या बँक खात्यात थेट उपचार चालू असेपर्यंत वर्ग करण्यात येतात.

नवसंजीवनी योजना : शासनाने आदिवासी उपयोजनांतर्गत योजनांच्या अंमलबजावणीमध्ये एकसूत्रता व प्रभावीपणा आणण्याच्या दृष्टीने सर्व घटक कार्यक्रमांना एकत्र करून नवसंजीवनी योजना शासन निर्णय २५ जून १९९५ अन्वये सुरू केली.

आदिवासी प्रवन कार्यक्षेत्रातील जनतेच्या आरोग्यात सुधारणा करणे, त्यांना आरोग्य विषयक सुविधा पुरवणे, आदिवासींना पिण्याचे शुद्ध व पुरेसे पाणी उपलब्ध करुन देणे, अन्नधान्य पुरवठा सुनिश्चित करून आहार देणे, कुपोषित बालकांवर योग्य व वेळीच उपचार करून त्यांच्या प्रकृतीत सुधारणा घडवून आणणे या सर्व उपाययोजनांद्वारे आदिवासींचे क्रियाशील आयुष्य वाढविणे तसेच गरोदर माता व अर्भक मृत्यू कमी करणे हा नवसंजीवनी योजनेचा प्रमुख उद्देश आहे.

नवसंजीवनी योजना राज्यात १९९५पासून सुरू करण्यात आली आहे. आदिवासी प्रवण कार्यक्षेत्रात राहणाऱ्या आदिवासी जनतेला प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र स्तरावर गावपातळीवर योग्य व वेळीच उपचार देण्यात येतात. मातृत्व अनुदान योजना, भरारी पथक योजना, दाई बैठक योजना, पाणी नमुना तपासणी, पावसाळ्यापूर्वी करावयाच्या उपाययोजना, सॅम व मॅमच्या मुलांना आहार सुविधा व बुडीत मजुरीपोटी द्यावयाचे अनुदान.

नवसंजीवनी योजनेंतर्गत आदिवासी प्रत्रात ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, आयुर्वेदिक दवाखाने या सर्व ठिकाणी रुग्णांना मोफत सेवा दिली जाते, तसेच फिरत्या आरोग्य पथकांमार्फतदेखील आरोग्य सेवा दिली जाते.

**कार्यक्रमांतर्गत विविध योजना व उपक्रम**

मातृत्व अनुदान योजना : गरोदर मातांची नियमित आरोग्य तपासणी व्हावी व त्यांन सुयोग्य आहार वेळेत उपलब्ध व्हावा, तसेच गरोदरपणात व नंतर विश्रांती मिळावी, त्यादृष्टीने शासनाने मातृत्व अनुदान योजना १९९७-९८पासून १६ आदिवासी जिल्ह्यांत मंजूर केली आहे. या योजनेमध्ये गरोदरपणामध्ये ४०० रुपये रोखीने व ४०० रुपयांची औषधे याप्रमाणे प्रत्येक लाभार्थीला एकूण ८०० रुपयांचा लाभ या योजनेंतर्गत दिला जातो. या योजनेचा लाभ हयात दोन मुले व सध्या गरोदर मातासाठी देय आहे.

भरारी पथक योजना : राज्यामध्ये एकूण २८१ भरारी पथके स्थापित करण्यात आली असून, यामध्ये एक वैद्यकीय अधिकारी व दोन कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या भरारी पथकांमार्फत राज्यातील दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी जनतेला विशेष करून माता व कुपोषित बालकांना भेटी देण्यात येतात व त्यांची आरोग्य तपासणी करण्यात येऊन आवश्यकता असल्यास नजिकच्या आरोग्य संस्थेमध्ये संदर्भित करण्यात येतात.

दाई बैठक योजना : आदिवासी व दुर्गम भागातील गरोदर स्त्रियांची बाळंतपणे दाईमार्फत केली जातात. अशा बाळंतपणाची व नवजात शिशूंची १०० टक्के नोंदणी करणे, जोखीमयुक्त मातांच्या व नवजात बालकाच्या आरोग्याचे सर्वेक्षण करणे, त्यावर नियंत्रण ठेवणे व त्यांना कृतिशील करणे याबाबत दाई बैठका घेऊन दाईच्या ज्ञानामध्ये वाढ होईल, याकरिता प्राथमिक आरोग्य केंद्राद्वारे दाईच्या नियमित बैठका घेण्यात येतात.

मान्सूनपूर्व उपाययोजना : पावसाळी कालावधीत बालमृत्यू व साथीचे रोग टाळण्याकरिता प्रतिबंधक उपाययोजना म्हणून वैद्यकीय पथके दुर्गम भागात पाठवून त्यांच्यामार्फत प्रत्येक गावात रुग्ण उपचार, बालकांची तपासणी व उपचार, लसीकरण संदर्भ सेवा, साथरोग प्रतिबंधक उपाय योजना इतर आजारांचे सर्वेक्षण इत्यादी कामे करून घेण्यात येतात.

या लेखांविषयी आपल्या प्रतिक्रिया व अभिप्राय arogyapatrikamhgmail.com या ई-मेलवर तसेच पत्रव्यवहारासाठी मुख्य संपादक, महाराष्ट्र आरोग्य पत्रिका तथा उपसंचालक, आरोग्य सेवा, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, परिवर्तन, आरोग्य भवन परिसर, विश्रांतवाडी पोलीस स्टेशनसमोर, येरवडा, पुणे-४११००६ येथे संपर्क साधावा. **(क्रमश:)**

**-मनोज शिवाजी सानप,**
**जिल्हा माहिती अधिकारी,**
**रायगड-अलिबाग**



## बदलते तंत्रज्ञान



# बॅटरी लाईफ वाढवण्यासाठी फॉलो करा 'या' टिप्स

स्मार्टफोनचा वापर आपण दिवसभर वेगवेगळ्या कामासाठी करतो, मात्र फोन दिवसभर वापरण्यासाठी यात पॉवरफुल बॅटरी असणेदेखील गरजेचे आहे. सध्या फोनमध्ये ५००० एमएएच, ६००० एमएएच बॅटरी मिळते. फोन जुना झाला की बॅटरी लाइफवर याचा परिणाम होतो, परंतु तुम्ही काही सोप्या टिप्स फॉलो करून बॅटरी लाइफ वाढवू शकता.

**ब्राइटनेस ठेवा कमी** : फोनच्या ब्राइटनेसचादेखील परिणाम बॅटरीवर होतो. ब्राइटनेस कमी असल्यास बॅटरी लवकर संपणार नाही. तुम्ही फोनच्या ब्राइटनेसला ऑटोवरदेखील सेट करू शकता.

**'या' सेटिंग्स ठेवा बंद** : गरज नसल्यास तुम्ही फोनच्या जीपीएस, ब्लूटूथ आणि वायफाय सेटिंगला बंद करू शकता. यामुळे बॅटरी लाइफ वाढण्यास मदत होईल. तसेच, मोबाइल डेटादेखील बंद ठेवावा. यामुळे बॅकग्राउंड ॲप्स डेटाचा वापर करणार नाहीत.

**बॅकग्राउंड ॲप्स** : फोनमध्ये काही ॲप्स बॅकग्राउंडमध्ये सतत काम करतात. याचा परिणाम फोनच्या बॅटरीवर परिणाम होतो. तुम्ही या ॲप्सला बंद करून बॅटरी लाइफ वाढवू शकता. फोनच्या सेटिंग्समध्ये जाऊन बॅकग्राउंडमध्ये काम करणाऱ्या ॲप्सला बंद करता येईल.

**स्क्रीन टाइम करा कमी** : फोनचा स्क्रीम टाइम जास्त असल्यास तो कमी करा. यामुळे बॅटरी लवकर ड्रेन होणार नाही. तुम्ही स्क्रीन टाइम ३० सेकंद निवडू शकता, तसेच वायब्रेशनच्या इंटेसिटीलादेखील कमी करा.

**लाइव्ह वॉलपेपर वापरू नका** : अनेकदा आपण फोनच्या स्क्रीनवर लाइव्ह वॉलपेपर ठेवतो. हे वॉलपेपर बॅटरीचा जास्त वापर करतात. त्यामुळे फोनच्या स्क्रीन साधा वॉलपेपर ठेवावा, तसेच फोनला चार्ज करताना ओरिजिनल चार्जरचाच वापर करावा. तुम्ही जर दुसऱ्या कंपनीच्या चार्जरचा वापर करत असाल तर बॅटरी खराब होईल.

# पहिल्या महिला शिक्षिका सावित्रीबाई फुले



## निमित्त

सावित्रीबाई जोतीराव फुले या एक भारतीय समाजसुधारक, शिक्षणतज्ज्ञ आणि कवयित्री होत्या. त्यांना भारतातील पहिल्या महिला शिक्षिका म्हणून ओळखले जाते. त्यांचे पती महात्मा ज्योतिराव फुले यांच्यासोबत त्यांनी भारतातील महिलांचे अधिकार सुधारण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. सावित्रीबाईंना भारतीय स्त्रीवादाची जननी मानले जाते. सावित्रीबाई आणि त्यांचे पती यांनी १८४८मध्ये पुणे येथील भिडेवाड्यात मुलींच्या शाळेची स्थापना केली. ही शाळा देशात स्थापन झालेल्या सुरुवातीच्या शाळांपैकी एक होती. सावित्रीबाईंच्या सामजिक कार्याबद्दल कृतज्ञता म्हणून १९९५पासून ३ जानेवारी हा सावित्रीबाईंचा जन्मदिन हा बालिकादिन म्हणून साजरा केला जातो.

सावित्रीबाईंच्या आईचे नाव लक्ष्मीबाई तर गावचे पाटील असणाऱ्या वडिलांचे नाव खंडोजी नेवसे पाटील होते. इ. स. १८४० साली जोतीराव फुले यांचेशी सावित्रीबाईंचा विवाह झाला. १ जानेवारी इ. स. १८४८ रोजी पुण्यातील बुधवार पेठेतील भिडेवाड्यात जोतीराव आणि सावित्रीबाईंनी मुलींची शाळा काढली. साऱ्या कर्मठ मनुवादी समाजाच्या विरोधाला न जुमानता विवाहानंतर शिक्षण घेतले आणि शिक्षक, मुख्याध्यापक बनून शिक्षण दिले. केवळ चार वर्षांत १८ शाळा उघडल्या आणि चालवल्या. तत्कालीन ब्रिटिश भारतातली एतद्देशीय व्यक्तीने काढलेली ही पहिलीच मुलींची शाळा ठरली.

या शाळेत सावित्रीबाई मुख्याध्यापिका म्हणून काम पाहू लागल्या. मुंबईतल्या गिरगावातही त्याच सुमारास स्टूडन्ट्स लिटररी ॲन्ड सायंटिफिक सोसायटीने कमळाबाई हायस्कूल नावाची मुलींसाठीची शाळा सुरू केली, ती शाळा २०१६ सालीही सुरू होती. सावित्रीबाईंच्या शाळेत सुरुवातीला शाळेत सहा मुली होत्या, पण १८४८ सालापर्यंत ही संख्या ४०-४५पर्यंत जाऊन पोहोचली. बाल-जरठ विवाहप्रथेमुळे अनेक मुली वयाच्या बारा-तेराव्या वर्षी विधवा व्हायच्या. ब्राह्मण समाजात विधवा पुनर्विवाह अजिबात मान्य नव्हता. जोतिरावांनी या समस्येवर उपाय म्हणून बालहत्या प्रतिबंधक गृह सुरू केले. सावित्रीबाईंनी ते समर्थपणे चालवले. याच ठिकाणी जन्मलेल्या काशीबाई या ब्राह्मण विधवेचे मूल त्यांनी दत्तक घेतले. त्याचे नाव यशवंत ठेवले.

केशवपन बंद करण्यासाठी नाभिक समाजातील लोकांचे प्रबोधन करणे व त्यांचा संप घडवून आणणे, पुनर्विवाहाचा कायदा व्हावा, यासाठी प्रयत्न करणे अशी अनेक कामे सावित्रीबाईंनी कल्पकतेने पार पाडली. सत्यशोधक समाजाच्या कार्यातही सावित्रीबाईंचा मोठा सहभाग असे. महात्मा फुले यांच्या निधनानंतर (इ. स. १८९०) सावित्रीबाईंनी सत्यशोधक समाजाच्या कार्याची धुरा वाहिली. आपल्या विचारांचा प्रसार त्यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून केला. 'काव्यफुले' व 'बावनकशी सुबोध रत्नाकर' हे काव्यसंग्रह त्यांनी लिहिले.

इ. स. १८९६ सालातल्या दुष्काळात सावित्रीबाईंनी समाजाला सत्कार्याचा आदर्श घालून दिला. पोटासाठी शरीरविक्रय करणाऱ्या बाया-बापड्यांना दुष्टांच्या तावडीतून सोडवून त्यांनी त्यांना सत्यशोधक कुटुंबांत आश्रयास पाठविले. त्यांच्या कार्याला हातभार म्हणून पंडिता रमाबाई, गायकवाड सरकार अशा लोकांनी मदतीचा हात पुढे केला. इ. स. १८९६-९७ दरम्यान पुण्यात प्लेगच्या साथीने धुमाकूळ घातला. हा जीवघेणा आजार अनेकांचे जीव घेऊ लागला. सावित्रीबाईंनी प्लेगपीडितांसाठी पुण्याजवळ वसलेल्या ससाणे यांच्या माळावर दवाखाना सुरू केला. त्या रोग्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना आधार देऊ लागल्या. प्लेगच्या रोग्यांची सेवा करताना सावित्रीबाईंनाही प्लेग झाला. त्यातून १० मार्च, इ. स. १८९७ रोजी त्यांचे निधन झाले.

**-साभार विकीपिडीया**

## क्लिक...क्लिक...!

(छाया : सुधीर नाझरे)



**मुरुड : वळणावळणाच्या रस्त्यावर विस्तारलेला हा वटवृक्ष आजूबाजूच्या निसर्गसौंदर्यात आणखी भर घालत आहे.**

## आरोग्य प्रहर

# थंडीत भाज्या भाजून खाल्ल्याने होतो फायदा

पूर्वी माणूस कच्ची फळे, कंदमुळे खात होता, कालांतराने आगीचा शोध लागल्यावर माणूस अन्न भाजून, शिजवून खाऊ लागला. काही काळाने तेलाचा वापर वाढू लागला आणि या तळण्याच्या प्रक्रियेने आरोग्याच्या अनेक समस्या निर्माण केल्या. म्हणूनच आता पुन्हा एकदा माणूस भाजून भाज्या, फळे खाण्यास प्राधान्य देत आहे.



थंडीच्या दिवसांत विशेषतः टोमॅटो, बटाटा व पेरू या तीन गोष्टी भाजून खाल्ल्यास शरीराला बरेच लाभ होऊ शकतात. हे

फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी जर्नलच्या माहितीनुसार, तुम्ही थेट जेव्हा पदार्थ भाजून खाता तेव्हा त्यातील पोषक तत्वे अबाधित राहतात. अगदी शरीराला आवश्यक साखरेपासून ते फॅट्सपर्यंत सर्व काही. अन्न भाजताना त्यावर एक कॅरॅमल थर तयार होतो व कुरकुरीतपणा येतो यामुळे तुम्हाला अगदी तळल्यासारखीच चव मिळते आणि कच्चे खाण्याइतकीचे पोषणही लाभू शकते. हाडांच्या मजबुतीसह किडनी व पोटाचे आरोग्य सुदृढ राहावे म्हणून व्हिटॅमिन सी महत्त्वाचे असते. संत्री, अननस, गाजर यांच्यात व्हिटॅमिन सी मुबलक असते. हे पदार्थ भाजून खाताना हे सत्व अबाधित राहते व त्यांच्यातील आंबटपणासुद्धा कमी होतो. फॅट्स व कॅलरीज वाढण्याचा धोका टळतो.

**टोमॅटो भाजून खाल्ल्याचे फायदे** : जेव्हा तुम्ही टोमॅटो भाजून खाता तेव्हा त्यातील अँटी ऑक्सिडंट्स सक्रिय होतात व त्याचा शरीराला अधिक लाभ होऊ शकतो. टोमॅटोमधील लाइकोपीन हे सत्व शरीराला पूर्णतः मिळू शकते. वजन कमी करण्यासाठी भाजलेल्या टोमॅटोचे सेवन फायदेशीर मानले जाते.

**बटाटा भाजून खाल्ल्याचे फायदे** : फूड अँड केमिस्ट्री जर्नलच्या माहितीनुसार, बटाटा जेव्हा भाजून खाल्ला जातो तेव्हा त्यातील फायबर ॲक्टिव्ह होते व पचनप्रक्रिया अधिक वेगाने होते. बटाट्यात असणारा व्हिटॅमिन बी ६ हा भाजल्याने ॲक्टिव्ह होऊन मेटाबॉलिज्म प्रक्रिया सुरळीत होते. जेव्हा तुम्ही बटाटा तळून खाता तेव्हा त्यात बॅड कोलेस्ट्रॉलचे प्रमाण वाढू शकते. याविरुद्ध जेव्हा तुम्ही बटाटा भाजून खाता तेव्हा हृदय विकारांचा धोका कमी होऊ शकतो.

**पेरू भाजून खाल्ल्याचे फायदे** : फूड केमिस्ट्री जर्नलच्या माहितीनुसार, सुक्या खोकल्यावर भाजलेला पेरू उत्तम ठरतो. पेरूतील व्हिटॅमिन सी शरीरातील कफ दूर करण्यास मदत करतो. यामुळे क्षमतासुद्धा वाढू शकते.

# सुधागडातील प्राचीन लेण्यांकडे प्रशासनासह 'पुरातत्त्व'चे दुर्लक्ष

## उपद्रवींकडून रंगरंगोटीतून विद्रुपीकरण, ऐतिहासिक ठेवा जोपासण्याची गरज

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यात प्राचीन व बहूमूल्य लेण्यांचे समूह आढळतात. येथे ठाणाळे, नेणवली, गोमाशी व चांभार लेणी अशा भव्य लेणींचा समूह आहे. देशविदेशातील अभ्यासक व पर्यटकांचे आकर्षण ठरत आहेत. मागील वर्षी येथील लेण्यांमध्ये अमेरिकेतील भन्ते वेन सुका ध्यानधारणेसाठी आल्या होत्या. तर अनेक देशविदेशातील अभ्यासक दौरे देखील करत असतात. जगभरातील पर्यटकांना भावणाऱ्या लेण्या स्तूप जतन करण्याची गरज निर्माण झाली आहे.



या प्राचीन लेण्यांकडे प्रशासन व पुरातत्व विभागाचे फारसे लक्ष नसल्याने त्यांची प्रचंड दुरवस्था झाली आहे. प्राचीन व मौलिक इतिहासाची भरभक्कम साक्ष देणाऱ्या या वास्तू नामशेष होण्याची भिती त्यामुळे त्यांचे जतन व संगोपन होण्याची आवश्यकता आहे. उपद्रवी लोकांकडून रंग रंगोटी, व विद्रुपीकरण करण्यात येत असल्याने लेणी प्रेमी व पर्यटकात नाराजी दिसून येत आहे.

निसर्गाच्या कुशीत वसलेल्या या प्राचीन बौद्ध कालीन लेण्यांची पुरती दुरवस्था झाली आहे. येथील स्तुप, विहार, चैत्यगृह, शिलालेख स्मारक यांची मोठ्या प्रमाणात पडझड झाली असून त्यावर अनेक उपद्रवी लोकांनी चक्क ऑईल पेन्टने नावे लिहीली आहेत. त्यामुळे ऐतिहासिक व इतिहासाची भरभक्कम साक्ष देणाऱ्या या वास्तू नामशेष होण्याची भिती आहे.



ही लेणी समुद्र किनाऱ्यावरुन चौल-धरमतर-नागोठणे खाडीमार्गे देशावर जाणारी व्यापारी केंद्रे होती असे म्हटले जाते. वाघजाई, घाटातून मावळात जाणारा प्राचीन मार्गही या लेण्यांजवळून जातो. यामुळे ही लेणी चौल बंदराच्या सानिध्याने खोदली गेली आहेत. कोकणातून घाटमार्गे देशावर जात-येतांना विश्रांतीचे स्थान म्हणुन हया लेण्यांचा उपयोग केला गेला. त्याचबरोबर बौद्ध भिक्षूंच्या भदन्त, आचार्य, परित्राजक यांच्या निवार्यासाठी सुद्धा या लेण्यांचा उपयोग इ.स. ५ व्या शतकापर्यंत करण्यात आला आहे.

या लेण्या अतिशय प्राचिन असून ऐतिहासिक आहेत. त्यामुळे पुरातत्व खात्याने वेळीच या लेण्यांची डागडुजी व देखभाल करणे गरजेचे आहे. येथे येणाऱ्या पर्यटकांनी लेण्यांवर नावे टाकुन येथील सौदर्याला गालबोट न लावता, येथिल परिसर साफ व संरक्षित कसा राहिल याची दक्षता घेतली पाहीजे, असे आवाहन शिवऋण प्रतिष्ठान महाराष्ट्रने केले आहे.

### ठाणाळे लेणीची वैशिष्ट्ये

*ठाणाळे लेणी समुहात चैत्यगृह, स्मारक,-स्तुपसमुह, सभागृह व उर्वरित २१ विहार लेणी आहे. बहुतांश विहारांमध्ये व्हरांडे आणि एक किंवा दोन खोल्या असून त्यामध्ये शयनासाठी ओटे आहेत. काही विहारांमध्ये समोरच्या भागात दालन व चार पाच भिक्षुंच्या निवासाची व्यवस्था आहे. अशा विहारात आंतरदालन, प्रवेशद्वार, खिडकी व शयन ओटे आहेत. ५ पायर्या असलेल्या एका विहारात वाकाटककालिन रंगीत चित्रांचे काही अवशेष दिसतात. प्राकृत ब्राम्ही लिपीतील शिलालेख असलेले एक पाण्याचे टाके आहे. पाण्याचे हौद, टाके, ब्राम्ही शिलालेख भित्तीचित्र आहेत. या सर्वांची मोठया प्रमाणात पडझड झाली आहे. बरेच अवशेष भग्नावस्थेत आहेत. अनेक उपद्रवी लोकांनी येथील स्तुप, चैत्यगृह, स्मारक यावर चुन्याने व ऑईल पेन्टने आपली नावे कोरली आहेत. त्यामुळे या ऐतिहासिक वास्तुचे सौंदर्य लुप्त झाले आहे. ठाणाळे लेण्यांसारखा ऐंतिहासिक व पुरातन ठेवा जतन करण्यासाठी प्रशासनाकडून विशेष व प्रभावी उपाययोजना राबविण्यात यावी अशी मागणी पर्यटकप्रेमी व लेणीप्रेमी यांनी केली आहे.*

# अलिबागजवळ अपघात; डंपरखाली गेल्याने दुचाकीचा चक्काचूर; दोन जण गंभीर जखमी

**अलिबाग : प्रतिनिधी**

रेवदंडा बायपासवरून पेणच्या दिशेने जाणारी दुचाकी खड्डे चुकवताना समोरून येणाऱ्या डंपरखाली गेल्याने अपघात झाला. सकाळी ११.३० च्या सुमारास हा अपघात अलिबाग रेवदंडा बायपास रस्त्यावरील एचपी पेट्रोल पंपाजवळ झाला. या अपघाताची भिषणता एवढी होती की दुचाकीचा अक्षरशः चक्काचूर झाला. दुचाकीवरील दोघेजण या अपघातात जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



या अपघातामुळे खडीने भरलेला डंपरमधील रेती संपूर्ण रस्त्यावर ओतावी लागल्याने अलिबाग पेण रस्त्यावर वाहतुकीची कोंडी झाली होती. विमलेश प्रेम यादव २२ रा. तुर्भे बेलापूर आणि प्रिन्स राजेश चौहान असे या अपघातात जखमी झालेल्या तरुणांची नावे आहेत. ते एसी दुरुस्तीच्या कामासाठी अलिबागमध्ये आले होते. रेवदंडा बायपास येथे एचपी पेट्रोल पंपाजवळ आले असता रस्त्यावर पडलेला खड्डा चुकविण्याच्या प्रयत्नात समोरून येणाऱ्या डंपरखाली दोघे सापडले. अपघात होताच घाबरलेल्या डंपर चालकाने घटनास्थळावरून पळ काढला. तिथे असलेल्या ग्रामस्थांनी वाहतूक पोलिसांच्या मदतीने त्यांना वाचवण्याचे प्रयत्न सुरू करण्यात आले. घटनास्थळी दोन जेसीबी आणून त्यांच्या साहाय्याने डंपर उचलण्याचे प्रयत्न सुरू करण्यात आले. त्यासाठी डंपरमधून रेती रस्त्यावर डंप करण्यात आली. त्यानंतर डंपर उचलून खाली अडकलेल्या तरुणांची सुटका करण्यात आली. या अपघातात दोघेही तरुण गंभीर जखमी झाल्याने त्यांना अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र गंभीर जखमी झाल्याने पुढील उपचारासाठी त्यांना मुंबईत हलविण्यात आले आहे.

या अपघातानंतर रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर वाहतूकीची कोंडी झाली होती.

# काकळघर उपसरपंचपदी सुरक्षा ठाकूर

**रेवदंडा : प्रतिनिधी**

काकळघर ग्रामपंचायतीच्या निवडणूकीत ग्रामपंचायतीत बहुमत मिळवीत सरपंचपदाची थेट निवडणूक लढवित विजय मिळलिवलेले बाळासाहेबाची शिवसेना अर्थात शिंदे गटाच्या नवनिर्वाचित सरपंच स्वस्तिक ठाकूर यांनी पदभार स्विकारला. त्यानंतर उपसरपंच निवडणूकीत सुरक्षा सुरेश ठाकूर यांनी बिनविरोध विजय संपादन केला. काकळघर ग्रामपंचायतीवर बाळासाहेबाची शिवसेना-शिंदे गटाने झेंडा फडकविला. काकळघर ग्रामपंचायत नवनिर्वाचीत सरपंच स्वस्तिक ठाकूर यांनी सरपंच पदभार स्विकारताच, उपसरपंच निवडणूक घेण्यात आली. उपसरपंचपदासाठी शेकापक्षाचेवतीने गोंविद लक्ष्मण ठाकूर तर बाळासाहेबाची शिवसेना-शिंदे गटाचेवतीने सुरक्षा सुरेश ठाकूर व निशांत दत्तात्रेय दांडेकर यांनी अर्ज दाखल केले होते.



# भाजप महिला मोर्चाची सामाजिक बांधिलकी

## अंगणवाडी घेतली दत्तक



**खोपोली : प्रतिनिधी**

समाजाचे देणे लागतो, या भावनेतून खोपोली भाजप महिला मोर्चाच्यावतीने प्रकाशनगर भागातील गरीब वस्तीतील अंगणवाडी दत्तक घेऊन त्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य तसेच खाऊ वाटप याद्वारे मदतीचा हात देत आहेत. अलीकडेच नवीन वर्षाचे औचित्य साधत अंगणवाडीतील महत्त्वाची कागदपत्रे व साहित्य ठेवण्यासाठी एक कपाट तसेच बसण्यासाठी चटई वाटपाचा कार्यक्रम अश्विनीताई पाटील (जिल्हा महिला मोर्चाचे अध्यक्ष) यांच्या उपस्थितीत शहर महिला मोर्चा अध्यक्षा शोभाताई काटे यांनी आयोजित केला होता.

या कार्यक्रमाला खोपोली शहर भाजप अध्यक्ष इंदरमल खंडेलवाल, सरचिटणीस हेमंत नांदे, प्रमोद पिंगळे, त्याचप्रमाणे शहर महिला मोर्चा सरचिटणीस अश्विनी अत्रे, माजी नगरसेविका अपर्णा मोरे, उपाध्यक्ष अपर्णा साठे, सुमिता महर्षी ,कामगार आघाडीचे सूर्यकांत देशमुख, शहर भाजप चिटणीस गोपाळ बावस्कर, ओबीसी सेलचे सुनील नांदे, शहर युवा अध्यक्ष अजय इंगुलकर यांच्यासह अनेक कार्यकर्ते तसेच स्थानिक ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी अश्विनीताई पाटील यांनी आपले विचार मांडताना कार्यकर्त्यांनी सामाजिक कार्यासाठी गरीब वस्तीत जाऊन मदतीचा हात द्यावा, असे आवाहन केले. शोभाताई काटे यांनी सुरू केलेल्या उपक्रमाबद्दल त्यांनी त्यांचे कौतुक केले. याच कार्यक्रमात माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांना अभिवादन करण्यात आले.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, श्री संदिप जनार्दन घोगरे यांनी दिनांक ३० मे १९९४ रोजी खरेदीखताने मौजे शिवकर ता. पनवेल जिल्हा रायगड येथे नोंदणीकृत दस्त क्र. ९१० सन १९९४ मे ३० तारखेस मे. पनवेल चे दुय्यम निबंधक यांचे कार्यालयात खरेदीखत नोंदणी करून खरेदी केली होती. सदर खरेदीखताची नोंदणीकेलेली मुळ प्रत गहाळ झाली आहे तरी सदर खरेदीखताची मुळ प्रत कोणासही आढळुन आल्यास वा सापडल्यास खाली नमुद पत्यावर संपर्क करावा ही नम्र विनंती.

ठिकाण - पनवेल
दिनांक ३०/१२/२०२२

संपर्कासाठी पत्ता :-
श्री संदिप जनार्दन घोगरे
मु. शिवकर, ता. पनवेल जिल्हा रायगड



## जाहीर पेपर नोटीस (प्रतिवादी क्र. १ करीता)

**मा. न्यायाधिश, सहकारी न्यायालय, रायगड, रत्नागिरी, मु. अलिबाग यांचे न्यायालयात**
**(रायगड, रत्नागिरी जिल्हा)**

मुकादमा क्रमांक/सी.सी./आर.जी.डी./९६/२०२२

**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल**
पत्ता : ६२६अे/७बी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारूती मंदिराजवळ टिळक रोड, पनवेल, रायगड ४१० २०६. — **वादी**

**विरूद्ध**

**१) श्री. संतोष जगन्नाथ जळगावकर**
पत्ता : ढेकू, पो. साजगाव, ता. खालापूर, जिल्हा रायगड - ४१०२०३.
**२) श्री. मुकुंद किसन कदम**
पत्ता : ढेकू, पो. साजगाव, ता. खालापूर, जिल्हा रायगड - ४१०२०३.
**३) श्री. आजमीर तुकाराम वाघमारे**
पत्ता : पो. साजगाव, ता. खालापूर, जिल्हा रायगड - ४१०२०३.
— **प्रतिवादी**

**दावा रुपये ७९,७७८/-**

ज्या अर्थी उपनिर्दिष्ट वादी यांनी दावा या न्यायालयात दाखल केला आहे. त्या अर्थी आपण आपली बाजू मांडण्यासाठी दि. ०६/०२/२०२३ रोजी सकाळी/दुपारी ठिक ११.०० वाजता स्वत: जातीने सदर दाव्याबाबतीतील कागदपत्रासह हजर रहावे.

या नोटीसीअन्वये आपणास असे कळविण्यांत येते की, वर नमूद केलेल्या दिवशी व वेळी आपण हजर राहण्यास कसूर केल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल.

त्याचप्रमाणे अशीही नोटीस देण्यात येते की, वर नमूद केलेल्या तारखेस अगर तत्पूर्वी सदर दाव्यातील हुकुमाची बजावणी करण्यासाठी आपला संपूर्ण पत्ता दाखल करण्यात कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. २३/१२/२०२२ रोजी माझी सही व न्यायालयाची मुद्रा यासह दिले.

कोर्टाचा पत्ता : सहकार न्यायालय रायगड-रत्नागिरी, सहकार भवन (रा.जि.प्रा. शिक्षक सह. पतसंस्था मर्या., अलिबाग कॅम्पस) दुसरा मजला, ब्राह्मण आळी, अलिबाग, एस.टी. स्टँडसमोर, मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड-४०२२०१.

सोबत लवाद दावा पाने

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**ज्युडिशियल क्लार्क**
**रायगड जिल्हा सहकारी न्यायालय, मु. अलिबाग**
**रायगड व रत्नागिरी जिल्हा**



## श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

ता. राहाता, जि. अहमदनगर, पिन नं ४२३१०९.
फोन नं. ०२४२३२५८५०० संकेतस्थळ : www.sai.org.in

**श्री साईबाबा संस्थानचे साईबाबा रूग्णालय व साईनाथ रुग्णालयासाठी खालीलप्रमाणे पदे भरावयाची आहेत.**

### SAIBABA HOSPITAL

| Sr No | Name of Post | No Of Post | Sr No | Name of Post | No Of Post |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Neurologists | 2 | 9 | General Surgeons | 2 |
| 2 | Nephrologists | 2 | 10 | Orthopaedic Surgeons | 2 |
| 3 | Haematologist | 1 | 11 | Senior Pathologists | 1 |
| 4 | Cardiac Surgeon | 1 | 12 | Physicians | 2 |
| 5 | Urosurgeons | 2 | 13 | Junior Radiologists | 1 |
| 6 | Plastic Surgeon | 1 | 14 | Casualty Medical Officer | 6 |
| 7 | Paedatrics Surgeon | 1 | 15 | R.M.O. | 14 |
| 8 | Maxillofacial Surgeon | 1 | | | |

### SAINATH HOSPITAL

| Sr No | Name of Post | No Of Post | Sr No | Name of Post | No Of Post |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Medical Officer (Physician) | 1 | 9 | Junior Anesthesiologist | 1 |
| 2 | Medical Officer (Radiologist) | 1 | 10 | Junior Intensivist | 4 |
| 3 | Paedatricians | 2 | 11 | Medical Officer (Sonologist) | 1 |
| 4 | Gynaecologists | 1 | 12 | Casualty Medical Officer (CMO) | 2 |
| 5 | Ophthalmalogist | 1 | 13 | Resident Medical Officer (RMO) | 4 |
| 6 | Medical Officer (Anesthesia) | 1 | 14 | Chief Blood Transfusion Officer | 1 |
| 7 | Medical Officer (Orthopaedic Surgeon) | 1 | 15 | Blood Transfusion Officer | 3 |
| 8 | ENT Surgeon | 1 | | | |

- वरील सर्व पदे ही ११ महिने कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरूपात भरण्यात येतील.
- उमेदवारांस संस्थान संकेतस्थळावर अपलोड केलेल्या मसुद्याप्रमाणे अर्ज करावा.
- उमेदवारांनी मुलाखतीस येताना सोबत शैक्षणिक व अनुभवाचे मुळ कागदपत्रे/प्रमाणपत्रे घेऊन यावे. सदर कागदपत्रे मुलाखतीचेवेळी तपासण्यात येतील.
- उमेदवारांची निवड ही संस्थानचे संकेतस्थळावर (www.sai.org.in) नमुद केलेल्या गुण तालीकेच्या आधारे करणेत येईल.
- कोणत्याही पदासाठी उमेदवार कमी असतील व अनुभव जाहिरातीत नमुद केलेप्रमाणे नसल्यास सदर पदासाठी उपस्थित उमेदवारांकरीता निकष व अनुभव शिथील करण्यात येवुन त्याखालील वेतनश्रेणी/ग्रेड पे (एकत्रित वेतन) देणेत येईल.
- नियुक्त केलेल्या उमेदवाराला रुग्णालयाचे गरजेनुसार कोणत्याही रुग्णालयात काम करावे लागेल.
- वेतन, प्रोत्साहन भत्ता, पात्रता, अनुभव, वय व इतर आवश्यक सविस्तर माहितीकरीता संस्थानचे संकेतस्थळ www.sai.org.in ला भेट द्यावी.
- सर्व कागदपत्रांसह अर्ज **दि.२५/०१/२०२३** रोजीचे आत जमा करावेत.

**(राहुल जाधव)**
उप मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी



**महाराष्ट्र शासन**
**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

## ऑनलाईन निविदा सूचना क्रमांक ६५ सन २०२२-२३

कार्यकारी अभियंता, महाड (सा. बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन - ४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडुन खालील प्रमाणे **(बी-१)** नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| ई निविदा क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित रक्कम | भाग अ (स्थापत्य कामाची किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ढालकाठी निगडे गोठवली रस्ता प्रजिमा-६७ कि.मी.६/०० ते १२/०० मध्ये सुधारणा करणे. (३.७५ मी. चे ५.५० मध्ये रुंदीकरण व डांबरीकरण करणे) तालुका महाड, जिल्हा रायगड. (५०५४ मार्ग व पुल यावरील भांडवली खर्च (०४) जिल्हा व व इतर मार्ग) | ३५५७६३२३ | ३३९०९४७८ | १७८००० | ३५४० | १२ महिने |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **०३/०१/२०२३** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **१८/०१/२०२३** वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ | निविदापूर्व बैठक | मा. मुख्य अभियंता (सा.बां.) प्रादेशिक विभाग, कोकण, फोर्ट मुंबई यांचे कार्यालयात दिनांक **१०/०१/२०२३ वेळ १५.०० वाजता.** |
| ३ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | अधीक्षक अभियंता, रायगड सा.बां. मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक **२०/०१/२०२३** वेळ १२.०० वाजता |

**टिप :-** परिपूर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/५३९५**
**दिनांक : २९/१२/२०२२**

**सही/**
**(एम. आर. नामदे)**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**



**महाराष्ट्र शासन**
**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

## निविदा सूचना क्रमांक ६७ सन २०२२-२३

खालील कामासाठी सिलबंद निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड, मु.पो. ता. महाड, जिल्हा रायगड पिनकोड नं. ४०२३०१ दूरध्वनी क्रमांक ०२१४५ - २२२१६७ हे महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून बी-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. को-या निविदा नमुना **दिनांक ०६/०१/२०२३ रोजी सकाळी १०.०० पासून ते दिनांक १३/०१/२०२३ रोजी १८.०० वाजेपर्यंत** www.mahapwd.gov.in या संकेत स्थळावरुन ऑनलाईन खरेदी करण्यांत येतील. व **दिनांक १६/०१/२०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता ऑफलाईन पध्दतीने या कार्यालयात सादर कराव्यात** व कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग, महाड हे भरुन पाठविलेल्या निविदा शक्यतो **दिनांक १६/०१/२०२३ रोजी ११.०० वाजता उघडतील.** निविदा उघडताना सर्व कंत्राटदारांनी उपस्थित रहाणे आवश्यक आहे. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखुन ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे लाखपाले मधली आळी ता. माणगांव येथे साकव बांधणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. **(डोंगरी)** | ४०४६७७ | ५००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग आठ व वरील |
| २ | मौजे लाखपाले ता. माणगांव श्री मुकूंद पाथरे ते विठठल रूख्मिणी मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याला गटार बांधणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. **(डोंगरी)** | ६४७४७१ | ७००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात **व वरील** |
| ३ | माणगांव येथील नांदवी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची दुरूस्ती करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. **(२०५९)** | ८३४३३४ | ९००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ४ | गोरेगांव येथील शासकीय विश्रामगृहाची (डाव्या बाजूस) आवार भिंत बांधणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. **(२०५९)** | ६८४८४० | ७००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ५ | गोरेगांव येथील शासकीय विश्रामगृहाची (मागील बाजूस) आवार भिंत बांधणे तालुका माणगांव, जिल्हा रायगड. **(२०५९)** | ८३४६०० | ९००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ६ | बारसगांव शिवथर रस्ता प्रजिमा ७० कि.मी. १३ / २३० मध्ये मोरीचे बांधकाम करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. **(रस्ते पुरहानी दुरूस्ती कार्यक्रम सन २०२२-२३)** | ७९२६०८ | ८००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ७ | मौजे बल्हे ग्रुप.ग्रा. पं. चिंचवली तर्फे आतोणे ता. रोहा येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका रोहा, जिल्हा रायगड. **(डोंगरी)** | ४०४४६३ | ५००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग आठ व वरील |
| ८ | मौजे हंडेवाडी ग्रुप.ग्रा.पं.चिंचवली तर्फे अतोणे ता. रोहा येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका रोहा, जिल्हा रायगड. **(डोंगरी)** | ४०४४६३ | ५००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग आठ व वरील |
| ९ | ग्रामपंचायत नागोठणे अंतर्गत नागोठणे जोगेश्वरी नगर येथे संरक्षण भिंत बांधणे. तालुका रोहा, जिल्हा रायगड. | ८०९३९१ | ९००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| १० | पोलादपूर वाई सुरूर रस्ता रा.मा. १३९ कि.मी. ० / २०० वरील पूलाच्या जाग्रवर नदीपात्रातील ॲप्रण बांधणे. तसेच नदीपात्रतील नाला सुस्थितीत करणे तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. **(रस्ते पुरहानी दुरूस्ती कार्यक्रम सन २०२२-२३)** | ७७७६६८ | ८००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |

**टिप :-** १. तपशिलवार निविदा सुचना https//mahapwd.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील.

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/५४३४**
**दिनांक : ३०/१२/२०२२**

विमाका/कोवि/२०२२-२०२३/२२१

**सही/**
**(एम. आर. नामदे)**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

# गरिबांना मिळणार मोफत धान्य

## नवी मुंबईतील ४८ हजार कुटुंबांना होणार लाभ



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत पुढच्या एका वर्षासाठी मोफत रेशन देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. त्या अनुषंगाने राज्य सरकारने ३० डिसेंबर रोजी एक परिपत्रक काढले आहे. त्यामुळे राज्यातील लाभार्थी कुटुंबांना या पुढील एक वर्ष मोफत धान्य मिळणार असून नवी मुंबई शहरात ४८ हजार कुटुंबे याचा लाभ घेतील.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा २०१३ या कायद्यांतर्गत नागरिकांना ३ रुपये किलोने तांदूळ तर दोन रुपये किलोने गहू दिले जातात. ही योजना डिसेंबर २०२२ पर्यंत होती, मात्र केंद्र सरकारने ३१डिसेंबर २०२२ रोजी संपणाऱ्या राष्ट्रीय अन्न सुरक्षांतर्गत मोफत रेशनच्या योजनेला आणखी एक वर्षाची मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे पुढील डिसेंबर २०२३पर्यंत ही मोफत अन्नधान्याची योजना सुरू राहणार आहे. यासाठी लाभार्थ्यांना एक रुपयाही द्यावा लागणार नाही.

केंद्र सरकार या योजनेवर वर्षाला सुमारे दोन लाख कोटी रुपये खर्च करणार आहे. या योजनेची अंमलबजावणी व्हावी म्हणून राज्यातील सर्व कक्ष अधिकारी, शिधावाटप नियंत्रक यांना राज्याच्या अन्न नागरी पुरवठा विभागाकडून ३० डिसेंबर रोजी एक पत्रक जारी केले असून या योजनेविषयी व्यापक प्रमाणात जनजागृती करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे राज्यातील लाभार्थी कुटुंबांना या पुढील एक वर्ष मोफत धान्य मिळणार असून नवी मुंबई शहरात ४८ हजार कुटुंबे याचा लाभ घेतील.

# नववर्षाच्या मुहूर्तावर वैद्यकीय मदत कक्ष सुरू

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली नववर्षाच्या शुभमुहूर्तावर रविवारी (दि. १) उपनेते विजय नाहटा यांच्या हस्ते व मुख्यमंत्री सहाय्यता निधी प्रमुख मंगेश चिवटे यांच्या प्रमुख उपस्थितीत नवी मुंबईतील नेरूळमध्ये बाळासाहेबांची शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे उद्घाटन झाले.

नवी मुंबईतील गरजू नागरिकांना तत्पर व वेळीच वैद्यकीय मदत आता प्राप्त होणार आहे. नवी मुंबई नेरूळमधील सेक्टर २८ येथील बाळासाहेबांची शिवसेना पक्षाच्या मध्यवर्ती कार्यालयात २४ तास वैद्यकीय मदत कक्ष सुरू झाला आहे. या मदत कक्षाचा शुभारंभावेळी उपनेते विजय नाहटा, मुख्यमंत्री सहाय्यता निधीप्रमुख मंगेश चिवटे, जिल्हाप्रमुख विजय चौगुले, माजी उपमहापौर व निमंत्रक अशोक गावडे, वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख राम राऊत, विजय यादव, महिला जिल्हा संघटक सरोजताई पाटील, शितल कचरे, माजी नगरसेविका स्वप्ना गावडे, उपजिल्हा प्रमुख रोहिदास पाटील, अजित सावंत, उत्तर भारतीय सेल प्रमुख कमलेश वर्मा, युवा सेना प्रमुख महेश कुलकर्णी, वैद्यकीय मदत कक्ष नवी मुंबई प्रमुख सोमेश्वर बढे यासह बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे नवी मुंबई पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### गरजूंना हक्काचे व्यासपीठ

**वैद्यकीय मदत कक्ष गरजू नागरिकांसाठी आपल्या हक्काचे व्यासपीठ आहे. आजारावर बिलात सवलत, आर्थिक मदत, विविध दुर्धर व महागड्या आजारावर राज्य, केंद्र आणि विविध चॅरिटी हॉस्पिटलकडून कशी व कोठून निधी मिळेल याची माहिती, मार्गदर्शन आणि प्रत्यक्ष मदत कक्षातून नागरिकांना उपलब्ध होणार आहे. कार्यकर्त्यांनी स्वयंस्फूर्तीने गरजू नागरिकांना मदत करण्यासाठी प्रयत्नशील राहावे, असे वैद्यकीय मदत कक्षाचे निमंत्रक अशोक गावडे यांनी सांगितले.**

## गतिरोधकांअभावी अपघात सुरूच

**नवी मुंबई : बातमीदार**

सानपाडा विभागामध्ये मिलेनियम हॉस्पिटल सानपाडा से.१० येथे चौक असून या ठिकाणी रस्त्याच्या कोणत्याही बाजूला गतिरोधक नसल्यामुळे वाहने सुसाट वेगाने धावत असतात अशावेळी गतिरोधक नसल्यामुळे कायमच लहान मोठे अपघात होताना दिसतात. त्यामुळे या चौकात गतिरोधक बसवून वाहनांच्या वेगाला लगाम घालावा, अशी मागणी बाळासाहेबांची शिवसेना गटाचे विसाजी लोके यांनी पालिकेकडे केली आहे.

सानपाडा येथील हा चौक सर्वाधिक वर्दळीचा ठरत आहे. एकीकडे महत्वाचा रस्ता तर दुसरीकडे कॉलेज व रहिवाशी भाग यामुळे सातत्याने या भागात गर्दी असते. वर्दळीचा मार्ग असतानाही या भागात वेगात वाहने हल्ली जात आहेत. कॉलेज कुमारांकडून देखील वेगात दुचाकी हाकल्या जातात. अनेकदा वेगात वाहने जतल असल्याने करकचून ब्रेक दाबल्याचे आवाज सातत्याने कानावर पडतात. तर अनेकदा या वेगाचे रूपांतर अपघातातदेखील झालेले पाहायला मिळते. किरकोळ अपघात होण्याचे प्रमाणदेखील वाढले असून काही दिवसांपूर्वी चारचाकीचा अपघात झाल्याने वेगवान वाहनांचा प्रश्न ऐरणीवर आला होता.



या सर्व बाबी लक्षात घेत शिंदे गटाचे विसाजी लोके यांनी पालिकेला या चारही मार्गांवर गतिरोधक बसवावेत अशी मागणी केली आहे. वाहतूक पोलिसांनी देखील या भागाची पाहणी केली आडून, त्यानुसार काही दिवसांत या भागात गतिरोधक बसवून वेगांवर नियंत्रण आणले जाणार आहे.

## नवी मुंबईत रविवारी रक्तदान शिबिर

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

शिवाई फॅमिली अ‍ॅण्ड चाईल्ड केअर क्लिनिक आणि समर्पण ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी (दि. ८) सकाळी ८ ते दुपारी ३ या वेळेत ऐरोली सेक्टर १६ शिवशंकर अपार्टमेंट येथे हे शिबिर होणार आहे. नाव नोंदणीसाठी ७२०८६०१०१८, ०२२२७७९५६०८ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.



# तुर्भे येथे घातक व ज्वलनशील तेल कंपन्यांचे प्रात्यक्षिक

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

घातक आणि ज्वलनशील उत्पादन हाताळताना तेल टर्मिनल वरून पेट्रोल पंपावर हस्तांतरण करताना अलार्म सिस्टीम कशी असावी, तसेच प्रसंगी काही दुर्घटना घडली तर कशी हाताळावी आग लागली तर कशी विझवावी याची प्रात्यक्षिक नवी मुंबईतील चार रासायनिक कंपन्यांनी एकत्रित तुर्भे एमआयडीसी येथे सदर केली.





नवी मुंबई शहरामध्ये एचपीसीएल आणि आयओसीएल सारख्या तेल कंपन्या वसलेल्या आहेत. या तेल कंपन्या घातक उत्पादन हाताळतात. हे घातक आणि अत्यंत ज्वलनशील उत्पादन देखील तेल टर्मिनल वरून पेट्रोल पंपांवर दररोज हस्तांतरित केले जाते. हे सर्व टँक व ट्रक उच्च तंत्रज्ञान ट्रॅकिंग उपकरणे, अलार्म सिस्टम आणि पॅनिक बटणांनी सुसज्ज आहेत. टँक व ट्रक ड्रायव्हर हेल्परसाठी इतके प्रशिक्षण आणि वर्ग करूनही कधीकधी अपघात होऊ शकतात. अशा वेळी काही दुर्घटना झाली तर कशी सामोरे जायचे त्यासाठी नवी मुंबई मध्ये एचपीसीएल डब्लूओटी, आयओसी एलडब्लूओटी, एचपीसीएल बीओटी आणि आयओसीएल ग्रीस प्लांटच्या सर्व चार तेल कंपन्यांनी आगीवरील तेल कंपन्यांची तयारी तपासण्यासाठी ऑफ साइट मॉक फायर ड्रिल प्रात्यक्षिके आयोजित केले होते.

या प्रशिक्षणाचे निरीक्षण करण्यासाठी ठाणे कारखाना संचालक विलास घोगरे, उप संचालक योगेश पतंगे, पी.एल. पाटील आदी उपस्थित होते. तसेच एचपीसीएल डब्लूओटी आणि बीओटी यांच्याकडून अश्विन डी. कुरील, आयओसीसीएल डब्लूओटी यांच्याकडून बिधान चंद्र बिस्वास आणि आयओसीएल ग्रीस प्लांटचे आर रविराज उपस्थित होते.

या वेळी पंकज नंदनवार सुरक्षा अधिकारी एचपीसीएल सहाय्यक संघाचे प्रतिनिधित्व करत होते, तर सुरक्षा अधिकारी आशिष तिवारी हे फायर कॉम्बॅट टीमचे प्रतिनिधित्व करत होते. दीपक मोंगा सेफ्टी ऑफिसर आयओसी एलग्रीस प्लांट यांनी रेस्क्यू टीमचे प्रतिनिधीत्व केले.

# रसायनी परिसरात काकस्पर्श झाला दुर्मीळ

## औद्योगिकीकरणामुळे संख्या झाली कमी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

एक चांगल्याप्रकारे विकसीत झालेला औद्योगिक पट्टा म्हणून रसायनी पाताळगंगा परिसराचा उल्लेख केला जातो. या ठिकाणी उद्योगधंद्यांबरोबरच नागरिककरणातही झपाट्याने वाढ झाली खरी, मात्र पाताळगंगेचे पाणी आणि सह्याद्रीच्या पर्वतरांगामधील समृध्द वनसंपदा धोक्यात आली असल्याचे येथे प्रकर्षाने जाणवू लागले आहे. एकेकाळी किलबिल करणारे पक्षाचे थवेच्या थवे आता गायब झाल्याचे दिसून येतात. विधी, कार्यात ज्या पक्षांना स्थान देण्यात आलेले आहेत, असे पक्षीही आता दिसेनासे झाले आहेत. रानटी पक्षी. तर सोडाच या परिसरात हमखास दिसनारे कावळेही गायब झालेत.

वाढता औद्योगिकीकरण आणि जैविक विविधतेला पोहचलेला धोका रसायनी परिसरात पदोपदी दिसून येतो. रसायनीतील गुळसुंदे येथील यादवकालीन सिद्धेश्वर मंदिरासमोरील वाहणाऱ्या पाताळगंगा नदीवर दशक्रिया विधी होत असतात विधी करण्यासाठी आलेल्या मृतांच्या नातेवाईकांचा पाहिलेला प्रसंग



अगदी बोलका होता. हिंदु संस्कृतीमध्ये जीवनमरणाच्या चक्रात कावळ्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. मरण कोणालाही चुकलेले नाही, अशाच एका व्यक्तीच्या दशक्रिया विधीसाठी आलेली माणसे भाताच्या पिडींला कावळ्याने स्पर्श करावा या प्रतिक्षेत बसली होती. बराचवेळ होवूनही कावळा काही पिंडाला स्पर्श करीत नव्हता. कावळे असतील तर ते येणार, परंतु नातेवाईक वाट पहात होते. शेवटी प्रतिक्षा संपल्यानंतर प्रत्येक नातेवाईक पिंडापुढे जाऊन डोळ्यांतील आसू आवरीत, तुमच्या मानाप्रम्राणे वागु, तुमची इच्छा पूर्ण करू असा शब्द देत पिडांवर पाणी वाहत होते. तरीही कावळा शिवत नसल्याचे पाहून मग एक एक करीत.

मुलाबाळांना नातेवाईकांना पिडांजवळ नमस्कार करण्यासाठी पाठविले जाते होते. बऱ्याच वेळानंतर कुठूनतरी एक कावळा अवतरतो, कावळा पिंडाला शिवतो आणि मग सर्वजण सुटकेच निःश्वास सोडतात. तो पर्यंत सर्व नातेवाईकांचा जीव भांड्यात पडलेला असतो. मृताचा जीव अडकलाय हा निष्कर्ष काढीत पुढच्या सोपस्काराला मोकळे होतात. तर काही वेळा दशक्रियेच्या पिंडाला कधीकधी कावळ्याचा स्पर्श होतच नाही. मग विविध निष्कर्ष काढण्यात येतात. पिंडाला कावळा शिवला नाही, तर मृत व्यक्तीचा आत्मा भटकत राहतो, अशी हिंदु संस्कृतीमध्ये धारणा आहे.

दरम्यान, पिंपळ, वड, चिंच आदी झाडांवर कावळ्याचे वास्तव्य असल्याचे. सध्याची परिस्थिती पाहिल्यास शहरातून कावळे आणि चिमण्या हद्दपार होत असल्याचे चित्र आहे. आता परिसरात कावळ्यांची संख्याही कमी होत असल्याची पक्षीप्रेमींची ओरड सर्वत्र होत आहे. याची जाणीव रसायनी परिसरात जास्तच जाणवत आहे.

## रोजी सोनी यांना फोटोजेनिक पुरस्कार



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मिसेज इंडिया द गॉड एसेज प्रेजंट्स मधु कमल मोशन पिक्चर्स आयोजित लक्मे अकादमी आणि गृहशोभा द्वारा प्रायोजित सौंदर्य स्पर्धेत नवी मुंबईच्या रोजी अश्विनी कुमार सोनी यांना सर्वश्रेष्ठ फोटोजेनिक पुरस्कार मिळाला.

उदयपुर येथील रमाडा स्पा एंड रिसॉर्ट्समध्ये या राष्ट्रीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये नवी मुंबईच्या विधीज्ञ रोजी अश्विनी कुमार सोनी मिसेज इंडिया, द गॉडेस प्रेजेंट स्पर्धेत फाइनलिस्ट होत्या. देशभरातील असंख्य स्पर्धक या स्पर्धेत सहभागी झाले होते. त्यांना सर्व फाइनलिस्ट मधून सर्वश्रेष्ठ फोटोजेनिक पुरस्कारासाठी निवडून सम्मानित करण्यात आले. नवी मुंबई पनवेल मधून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

रोजी सोनी यांचा सगळा जीवन प्रवास खुपच विलक्षणीय आहे. लग्न लवकर झाल्याने त्यांनी लग्नाच्या चौदा वर्षानंतर स्वतःचे एलएलबी शिक्षण पुर्ण केले. सध्या निष्णात वकील म्हणून त्यांची ख्याती आहे. त्या पुढील एलएलएम कोर्स करण्याची तयारी करत आहेत. हरियाणा राज्यातील एका छोटेखानी शहरात त्यांचा जन्म झाला आहे. मुंबई आल्यानंतर त्यांनी आपल्या शिक्षणावर लक्ष केंद्रित केले आणी वयाच्या ३६ व्या वर्षी आजचा बहुमान संपादित केला आहे. त्यामुळे त्यांच्या यशाचे सर्वांनाच मोठे अप्रूप वाटत आहे.

घरसंसारमध्ये लक्ष देऊन स्वतःचे शिक्षण व करिअर करण्यासाठी इच्छुक महिलांना रोजी सोनी यांचे यश प्रेरणादायी आहे. लग्न मुलबाळ असतांनादेखील त्यांनी जीवनात बाळगलेलं ध्येय साधणे सुरु ठेवले आहे. महिला आणि बालकांचे अधिकार याबाबतीत त्या विशेष दक्ष असतात. प्रशासकीय सेवेत जाण्याचे त्यांचे भविष्यात ध्येय आहे.

# नवी मुंबई महापालिकेचा वर्धापन दिन उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेचा विष्णूदास भावे नाट्यगृह येथे झालेल्या ३१ व्या वर्धापनदिन समारंभात अधिकारी, कर्मचारीवृंदाने गीत, नृत्य तसेच इतर कलाविष्कार सादर करीत अंगभूत कलागुणांचे प्रदर्शन केले. यामधील सर्वोत्कृष्ट कलाविष्कारांना अधिकाऱ्यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

महिलांकरिता होम मिनिस्टर ही विशेष स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये १७५ महिला कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. त्यामधून टॉप पाच विजेत्यांना बक्षीस स्वरुपात पैठणी प्रदान करण्यात आली.

**विविध स्पर्धांसह गुणवंतांचा गौरव**

एकपात्री नाट्य, नकला, वादन, कविता वाचन अशा वैयक्तिक कलाविष्कारामध्ये नारायण लांडगे प्रथम क्रमांकाचे तसेच पुष्पांजली कर्वे व्दितीय व शारदा बनसोडे तृतीय क्रमांकाचे मानकरी ठरले. अरविंद उरसळ आणि निखिल धावटे यांनी उत्तेजनार्थ पारितोषिके पटकाविली. शिक्षण विभागाने सादर केलेल्या नाटिकेस विशेष पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

पुरुषांच्या क्रिकेट स्पर्धेमध्ये सहभागी ३८ संघांमधून कोपरखैरणे विभाग कार्यलयाचा संघ विजेता व अग्निशमन विभागाचा संघ उपविजेता चषकाचा मानकरी ठरला. महिलांच्या १० संघांमध्ये झालेल्या क्रिकेट स्पर्धेत शिक्षण विभागाचा संघ विजेता व ईटीसी अपंग शिक्षण प्रशिक्षण केंद्राचा संघ उपविजेता ठरला.



पुरुषांच्या व्हॉलिबॉल स्पर्धेत ६ संघांमधून अग्निशमन दल कोपरखैरणे विजेते तसेच लेखा विभाग उपविजेते पदाचे मानकरी ठरले. महिलांच्या थ्रो बॉल स्पर्धेत ६ संघांमधून लेखा विभागाचा संघ विजेतेपदाचा आणि ईटीसी अपंग शिक्षण प्रशिक्षण विभागाचा संघ उपविजेतेपदाचा मानकरी ठरला.

पुरुषांच्या कॅरम स्पर्धेत ११४ स्पर्धकांमधून साहेबराव गायकवाड प्रथम तसेच विनायक शिंदे व्दितीय व गणेश उपरे तृतीय क्रमांकाचे विजेते ठरले. महिलांच्या कॅरम स्पर्धेत ३० स्पर्धकांमधून मनिषा पवार प्रथम, स्वाती अमृते व्दितीय आणि नेहा चव्हाण तृतीय क्रमांकाचे विजेते ठरले.

पुरुषांच्या बुध्दीबळ स्पर्धेत २५ स्पर्धकांमधून मंगेश काठोळे प्रथम क्रमांकाचे विजेते झाले तसेच विलास मलुष्टे आणि अमित मालगावकर यांनी अनुक्रमे व्दितीय आणि तृतीय क्रमांकाची पारितोषिके पटकाविली. महिलांच्या बुद्धीबळ स्पर्धेत १६ स्पर्धकांमधून वर्षा गायकवाड यांनी प्रथम, सुहासी गरुडे यांनी व्दितीय व श्वेता उगलमुगले यांनी तृतीय क्रमांकाचे पारितोषिक संपादन केले.

१०० मीटर धावणे स्पर्धेत आकाश नलावडे, गजानन कायंदे व मनोज चव्हाण अनुक्रमे प्रथम, व्दितीय, तृतीय क्रमांकाचे मानकरी ठरले. ४० वर्षाखालील महिलांच्या ५० मीटर धावणे स्पर्धेत नेहा ठाकूर, अनुश्री खांडेभरड व रेणुका म्हात्रे तसेच ४० वर्षावरील महिलांच्या ५० मीटर धावणे स्पर्धेत कांचन माळी, अश्विनी गवते, दिपमाला सिंग अनुक्रमे प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांकाचे विजते ठरले.

पुरुषांच्या लांब उडीत आकाश नलावडे, एकनाथ खेडकर, संदीप सिंह तसेच महिलांच्या लांब उडी स्पर्धेत नेहा ठाकूर, अश्विनी गवते व अंकीता धराडे हे अनुक्रमे तीन क्रमांकाचे मानकरी ठरले.

गोळाफेक स्पर्धेत पुरुष गटात मनोज चव्हाण, गजानन कायंदे, सागर पाटील यांनी त्याचप्रमाणे महिला गटात कल्पना शिंदे, कार्तिकी वाडकर, सिमा विश्वे यांनी अनुक्रमे तीन क्रमांकाची पारितोषिके पटकाविली.

पाककला स्पर्धेत सुचिता गीध, सुहासी गरुडे, निता रांजणे त्याचप्रमाणे रांगोळी स्पर्धेत स्नेहल कोदे, सुविज्ञा पाटील व वैशाली मार्के यांनी अनुक्रमे तीन क्रमांकाची पारितोषिके पटकाविली. संगीत खुर्ची स्पर्धेत कल्पना गोसावी प्रथम क्रमांकाच्या व स्मिता चौलकर व्दितीय क्रमांकाच्या मानकरी ठरल्या.

नवी मुंबई पालिकेच्या वर्धापन दिनांमध्ये सतत २५ वर्षे समुहनृत्य सादर करणाऱ्या नृत्यसमुहाचे प्रमुख रवी जाधव यांचा रौप्यमहोत्सवी सादरीकरणानिमित्त विशेष सन्मान करण्यात आला. त्याचप्रमाणे स्पर्धांचे परीक्षक प्रा. आदित्य जोशी व प्रा. हर्षल अड्डणीकर, श्रीहरी पवळे, रुपाली वराडकर व महेंद्र शिवशरण यांनाही सन्मानीत करण्यात आले.

या उपक्रम आयोजनात क्रीडा व सांस्कृतिक कार्य विभागाचे उपायुक्त सोमनाथ पोटरे यांच्यासह क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव तसेच सर्वश्री रवी जाधव, विलास कांबळे, अरविंद उरसळ, गिरीश चावरे, संतोष मळेकर, अभिजीत काटकर यांनी त्याचप्रमाणे महिलांच्या उपक्रम आयोजनात महापालिका सचिव चित्रा बाविस्कर, उपायुक्त मंगला माळवे, शिक्षणाधिकारी अरुणा यादव, आदिती कुवेसकर, मनिषा ठाकूर, गायत्री चौधरी, विद्या कदम, प्रतिक्षा बिलकुले, कल्पना गोसावी, संजीवनी मिसळे, मनिषा कदम, अस्मिता कोंडाळकर यांनी विशेष योगदान दिले.

# मुरुड नगर परिषदेसमोर कोळी समाज ठिय्या आंदोलन करणार

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड शहरातील जुना पाडा महादेव कोळी समाज मुरुड सिटी सर्वे नंबर ६५.ड २ या कोळी लोकांचे बिन आकारी होळीचे मैदान असून येथे मुरुड नगरपरिषदेचे गटाराचे बांधकाम सुरु असतानाच काळ भैरव देवस्थान मंदिर ट्रस्ट भंडारी समाज मुरुड यांनी गटाराच्या मूळ बांधकामात अनधिकृतपणे लोखंडी खांब उभे केले आहेत. असे केल्याने मुरुड भंडारी समाजाने त्यांचा कोणताही संबंध नसताना आमच्या समाजाच्या होळीच्या ठिकाणाला सीमांकित करण्याचा प्रयत्न केला आहे. हे लोखंडी खांब तातडीने काढून टाका अन्यथा ५ जानेवारी रोजी मुरुड नगरपरिषद कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करणार असल्याचा इशारा मुख्याधिकारी मुरुड नगरपरिषद याना या वेळी देण्यात आला आहे.



या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, काळभैरव देवस्थान मंदिर ट्रस्ट भंडारी समाज मुरुड यांचा या जागेशी काडीमात्र संबंध नसलेल्या मौजे मुरुड, स.नं. ६५/२ या कोळी लोकांच्या बिनआकारी होळीचे मैदान मुरुड अशी शासकीय दप्तरी सातबाऱ्यावर नोंद असलेल्या कोळी लोकांच्या जागेवर लोखंडी खांब उभे करुन आता आमच्या समाजाची शतकांपुर्वीपासून लागणाऱ्या होळीचे स्थान स्थलांतरीत करण्याची मागणी करुन सरळ सरळ ही जागा हडप करण्याचा डाव काळभैरव देवस्थान मंदिर ट्रस्ट भंडारी समाज मुरुड यांचा असल्याचा आरोप मुरुड नगरपरिषदेला दिलेल्या निवेदनातून कोळी समाजाने केला आहे. अडीच वर्ष अधिक काळापासून नगरपरिषदेकडे वारंवार अनेक तक्रार अर्ज व निवेदन करुनसुध्दा प्रत्यक्षरित्या लोखंडी खांब हे या जागेतून हटवण्यात आले नाही.

### ५ जानेवारीपासून धडक देण्याचा इशारा

मुरुड नगर परिषदेकडून तो लोखंडी खांब काढून टाकण्यासाठी ठोस प्रकारची कारवाई व्हावी यासाठी कोळी समाज येत्या ५ जानेवारी २०२३ पासून मुरुड नगरपरिषदेवर ठिय्या आंदोलन नगर परिषद प्रांगणात सुरु करणार आहे. नगरपरिषदेच्या उदासीन धोरणामुळे लोखंडी पोल काढले जात नाही. यावर कोळी समाजाने नाराजी व्यक्त केली आहे. याबाबतचे निवेदन मुख्याधिकारी मुरुड नगरपरिषदेसह जिल्हाधिकारी रायगड, जिल्हा पोलीस अधीक्षक, तहसीलदार मुरुड, मुरुड पोलीस निरीक्षक याना देण्यात आलेल्या आहेत.

# माणगावमध्ये अपघातात दुचाकीचालकाचा मृत्यू

**माणगाव: प्रतिनिधी**

माणगावपासून बारा किमी अंतरावर असणाऱ्या लाखपालेच्या हद्दीत मुंबई –गोवा महामार्गावर दोन दुचाकी वाहनांची एकमेकांना धडक बसल्याने या अपघातात दुचाकीवर मागे बसलेल्या २२ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला तर चालक किरकोळ जखमी झाला आहे. हा अपघात शनिवारी घडला.

या अपघाताबाबत गोरेगाव पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी, महाडकडून माणगावकडे जाणाऱ्या अज्ञात दुचाकीची लाखपाले गावच्या हद्दीत मुंबईकडून पोलादपूरकडे जाणाऱ्या सुझुकी अँक्सीस दुचाकीला धडक बसली. या अपघातात सुझुकी अँक्सीस दुचाकीवर मागे बसलेला तरुण परेश मुरलीधर नार्वेकर (वय–२२) रा. गोरेगाव प. मुंबई याचा मृत्यू झाला. तर सुझुकीचा चालक रोहित बबन पोटे (वय–२२) रा. गोरेगाव प. मुंबई हा किरकोळ जखमी झाला आहे.

अपघाताची माहिती मिळताच टेमपाले येथील सामाजिक कार्यकर्ते मजिदभाई लोखंडे व गोरेगाव पोलिसांनी अपघातग्रस्तांना उपजिल्हा रुग्णालयात आणले.

या अपघाताची नोंद गोरेगाव पोलिसात दाखल करण्यात आली असून अपघाताचा अधिक तपास गोरेगाव पोलीस करीत आहेत.

# महाडच्या ७३ ग्रामपंचायतींमध्ये उपसरपंच विराजमान

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील ७३ ग्रामपंचायतींच्या उपसरपंच पदासाठी सोमवारी निवडणूका घेण्यात आल्या. १८ डिसेंबर रोजी निवडणूक प्रक्रिया पार पडलेल्या ग्रामपंचायतींच्या उपसरपंच पदासाठी या निवडणूका होत्या.

सोमवारी सकाळी १०:३० वाजता उपसरपंच पदासाठी इच्छुक असलेल्या सदस्यांनी ग्राम पंचायतीत अर्ज दाखल केले. ९ वाजल्या पासूनच ग्रामपंचायतींच्या बाहेर नागरिकांची गर्दी जमू लागली होती. अकरा वाजल्यापासून तालुक्यातील स्थानिक ग्रामपंचायतींमध्ये अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली. ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक यांनी निवडून आलेल्या सरपंचाच्या अध्यक्षतेखाली अर्ज स्वीकारत थेट २ वाजता निवडणूक प्रक्रियेला सुरवात केली, मात्र अनेक ग्रामपंच्यातीमध्ये ज्या ज्या पक्षांना बहुमत होते अशा ग्रामपंचायतीमध्ये पक्षाने दिलेले उपसरपंच यांची निवडणूक न घेता पद जाहीर करण्यात आले. तर अनेक ठिकाणी निवडणुका पार पडल्यानंतर सरपंच यांनी सदस्यांमधून ज्यांना जास्त मतदान झाले यांना उपसरपंचपद जाहीर केले.

महाड तालुक्यातील उर्वरित ४८ ग्रामपंचायतींमध्ये सार्वत्रिक तर तीन ग्रामपंचायतींमध्ये काही प्रभागां करता निवडणूक घेण्यात आली होती. या सर्व ठिकाणी उपसरपंच पदाच्या निवडणुका पार पडल्या. तालुक्यातील फाळकेवाडी व कुंबळे या ग्रामपंचायतीमध्ये आरक्षित प्रवर्गाचा सरपंच उमेदवार उपलब्ध न झाल्याने ही दोन्ही पदे रिक्त होती त्यामुळे या ठिकाणी मंडल अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली उपसरपंचपदाची निवडणूक पार पडली. काही ग्रामपंचायतीमध्ये सकाळी ११ वाजता अर्ज दाखल करण्यात आले तर काही ठिकाणी दुपारी निवडणूक होण्याच्या पूर्वी अर्ज दाखल करण्यात आले. महाड औद्योगिक क्षेत्रामधील नडगाव, कांबळे, सवाणे तसेच महाड तालुक्यातील दासगाव, करंजखोल येथील उपसरपंच पदाच्या निवडणुकीला महत्त्व प्राप्त झालेले होते. तालुक्यामध्ये सर्व ग्रामपंचायतच्या ठिकाणी उपसरपंचपदाची निवडणूक शांततेत पार पडली.



# खालापुरातील १४ सरपंचांनी पदभार स्वीकारला

**खालापूर : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील १४ ग्रामपंचायतींच्या निवडणूकीचा कार्यक्रम २० डिसेंबर रोजी पार पडल्यानंतर २ जानेवारीला नवनियुक्त सरपंचांच्या पदग्रहण सोहळा व उपसरपंचांची निवड हा कार्यक्रम झाला. बहुतांश ठिकाणी उपसरपंचांची निवड ही बिनविरोध झाली असून तालुक्यात कुठेही अनुचित प्रकार घडला नसल्याने सर्वांनी समाधान व्यक्त केले आहे.

सोमवारी तालुक्यातील १४ ग्राम पंचायतीच्या सरपंचांनी पदभार स्वीकारला तर उपसरपंचांच्या निवडीची प्रक्रिया शांततेत पार पडली. यामध्ये टेंभरी, वांवढळ, नडोदे, हाळ खुर्द, माजगाव, देवन्हावे, खरिवली, चावणी, माडप, वडवळ, आपटी, होराळे, वावोशी व गोरठण बु!! या ग्राम पंचायतींच्या समावेश होता.

गोरठण बु!! ग्राम पंचायत बिनविरोध झाल्याने येथे सरपंच किशोर पाटील तर उपसरपंच ॲड. रमेश पाटील यांची निवड करण्यात आली.

वावोशी – सरपंचपदी अश्विनी उदय शहाने तर उपसरपंचपदी दिपाली गुरव, (शिंदे गट). होराळे – सरपंचपदी निलम समिर भुईकोट तर उपसरपंचपदी अंकुश मोरे. (भाजप). आपटी – सरपंचपदी कामिनी पांडवे तर उपसरपंचपदी नितिन मोरे. (शिंदे गट). वडवळ – सरपंचपदी ज्ञानेश्वर सुतार तर उपसरपंचपदी किरण सपकाळ. भाजप,_ माडप – सरपंचपदी अर्चना पाटील तर उपसरपंचपदी निलम निरगुडा. (महाविकास आघाडी) चावणी – सरपंचपदी बाळासाहेब आखाडे तर उपसरपंचपदी सुखदेव भोसले. (महाविकास आघाडी), खरिवली – सरपंचपदी सुंदरा रघुनाथ पवार तर उपसरपंचपदी सुशांत विचारे. शिंदे गट, देवन्हावे – सरपंचपदी रत्ना वाघमारे तर उपसरपंचपदी मनोज पाटील. (शिवसेना महाविकास आघाडी), साजगाव – सरपंचपदी विनोद खवळे तर उपसरपंचपदी अजित देशमुख, _हाळ खुर्द – सरपंचपदी शबनम हनिफमुल्ला तर उपसरपंचपदी अजित मांडळेकर. (शिवसेना), _नडोदे – सरपंचपदी निकिता भालेराव तर उपसरपंचपदी निशा शिंदे. (शिवसेना), वावंढळ – सरपंचपदी सुहास कदम तर उपसरपंचपदी अमोल कदम. शिवसेना, टेंभरी – सरपंचपदी रमेश गायकवाड तर उपसरपंचपदी दर्शना फाटे. (शिवसेना).

# नववर्षाच्या पहिल्याच दिवशी ५९ उपासकांनी केले रक्तदान

**कर्जत : प्रतिनिधी**

श्री अनिरुद्ध उपासना केंद्र कर्जतच्यावतीने समर्पण ब्लड बँक कल्याणच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. नव वर्षाच्या पहिल्याच दिवशी ५९ उपासकांनी रक्तदान करून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी आयोजित केलेले कर्जत – खालापूर तालुक्यातील ४६५ वे रक्तदान शिबिर होते.



सद्गुरु श्री अनिरुद्ध उपासना केंद्र कर्जतच्यावतीने रविवारी सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत शनी महाराज मंदिर कर्जत येथे आयोजित करण्यात आले होते. ज्येष्ठ उपासक अरुण गुरव यांनी ६५ वर्षे पूर्ण झाली तरी मला आज शेवटचे रक्तदान करू द्या. अशी विनंती केली. त्यानंतर डॉक्टरांनी त्यांना तपासले व रक्तदान करण्याची अनुमती दिली. गुरव यांनी रक्तदान केल्यावर त्यांचा सत्कार करण्यात आला. विशेष म्हणजे उपासक शिरीष दिघे यांनी पत्नी, मुलगा व कन्या यांच्या सह रक्तदान केले. याप्रसंगी रक्तसंकलानाचे काम घाटकोपर येथील समर्पण रक्तपेढीचे डॉक्टर शेख, लक्ष्मण नाईक, व इतर कर्मचाऱ्यांनी केले. याप्रसंगी एकूण ८० जणांनी रक्तदान करण्यासाठी हजेरी लावली त्यापैकी एकूण ५९ रक्तदात्यांनी रक्तदान केले तर २१ जण रक्तदान करण्यासाठी अपात्र ठरले.

याप्रसंगी सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी, गणेश सोनी, मीना प्रभावळकर, मुकेश सुर्वे, संदीप पाटील, डॉ. प्रशांत सदावर्ते, गणेश राऊत, जयेश म्हसे, विनोद पांडे, कृष्णा जाधव, संजीव ठाकरे, प्रकाश शहा आदी उपस्थित होते.

# राज्यस्तरीय डॉ. चिंतामणराव देशमुख वक्तृत्व स्पर्धा रोह्यात १६ जानेवारीला

**रोहे : प्रतिनिधी**

डॉ. चिंतामणराव देशमुख आंतर महाविद्यालयीन राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन को.ए.सो.चे डॉ.सी. डी. देशमुख वाणिज्य व सौ. के. जी. ताम्हाणे कला महाविद्यालय आणि सार्वजनिक गणेशोत्सव ट्रस्ट रोहा यांच्या विद्यमाने १६ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आली आहे.

या स्पर्धेत राष्ट्राच्या जडणघडणीत युवा मतदाराची भूमिका, राजकीय नेते आणि नैतिक मूल्य, महासत्तेच्या संघर्षात पर्यावरणाची समस्या, ऑनलाइन शिक्षण प्रवाहातील विद्यार्थ्यांचे भवितव्य, बदलत्या सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील स्त्रियांची प्रतिमा, डॉ. चिंतामणराव देशमुखांचे आर्थिक विचार हे विषय असून त्यासाठी ठेवण्यात आलेल्या पारितोषिकामध्ये ् प्रथम क्रमांक ५००१ रूपये, द्वितीय क्रमांक ४००१ रूपये, तृतीय क्रमांक ३००१ रूपये, उत्तेजनार्थ १) १५०१ रुपये, २) १५०१ रुपये आदी ठेवण्यात आले आहे. स्पर्धेत राज्यस्तरीय वकृत्व स्पर्धेसाठी कनिष्ठ महाविद्यालयीन व वरिष्ठ महाविद्यालयीन गटासाठी स्वतंत्र चषक प्रदान केले जातील. सहभागी सर्व विद्यार्थ्यांना विशेष सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल. स्पर्धे साठी विनामूल्य प्रवेश राहील. स्पर्धेसाठी माध्यम मराठी असेल. १६ते २५ वयोगटातील स्पर्धक सहभागी होऊ शकतात. स्पर्धकांनी स्पर्धेसाठी नोंद करणे आवश्यक आह. नोंदणीसाठी ई–मेल cdcc2007gmail.com हे आहे. स्पर्धकाने कोणत्याही एका विषयावर १०(८+२) मिनिटांत आपला विषय मांडायचा आहे. स्पर्धकांनी दोन विद्यार्थ्यांचा संघाची प्रवेशिका १४ जानेवारी पर्यंत महाविद्यालयाकडे email Ûmao पाठवावी.

Email address - cdcc2007gmail.com संयोजकांना या क्रमांकावर ९५२७७६५५९८ Copy पाठवावी. स्पर्धेत कोणतेही बदल करण्याचे हक्क संयोजकांकडे असतील. एका कॉलेजमधील दोन स्पर्धकांना प्रवेश मिळेल. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी संपर्क चंद्रकांत पार्टे , अध्यक्ष, सार्वजनिक गणेशोत्सव ट्रस्ट रोहा ८६९८६३२२६३, प्राचार्य डॉ. अतुल साळुंके ९४२२४९५८१३, डॉ. सम्राट जाधव, स्पर्धा प्रमुख ९५२७७६५५९८/ ९९८७१५६९९६ prof. samratjadhav99gmail.com./ cdcc2007gmail.com येथे साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# चौक व्यापारी संघटनेतर्फे महापूजा

**चौक : प्रतिनिधी**

चौक बाजारपेठ येथील व्यापारी संघटनेतर्फे नवीन वर्षानिमित्त सत्यनारायण पूजेचे आयोजन करण्यात आले होते. चौक व्यापारी संघटनेचे नवनिर्वाचित अध्यक्ष हर्षल हनुमंत यांची एकमुखाने निवड झाल्यानंतर प्रथमच या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. १ जानेवारी वर्ष अभिनंदन करताना सर्वस्तरातून व्यापारी वर्गांची सदस्य नोंदणी करून सर्वांना योग्य मार्गदर्शन देण्यात येत आहे.



सर्वस्तरातील व्यापाऱ्यांच्या व्यवसायातील कमतरता, उणीव यांच्यावर लक्ष ठेवून पुढील कारकीर्दीत चौकमधील सर्व व्यापाऱ्यांची हितगुज करून त्यांच्या समस्या सोडविणार असल्याचे अध्यक्ष हर्षल हनुमंते यांनी सांगितले. १ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता महापूजा तसेच रात्री ९ वाजता प्रभाकर सालेकर आणि सहकारी यांचे सुश्राव्य भजन, तीर्थ प्रसादाचा कार्यक्रम आयोजित केला होता.

या कार्यक्रमात सुमारे एक हजार भाविकांनी तीर्थप्रसाद व अल्पोपहाराचा लाभ घेतला. कार्यक्रम पार पाडण्यासाठी उपाध्यक्ष सचिन साखरे, खजिनदार सदाशिव बोराडे, महेश चौधरी, सेक्रेटरी,निमिष दबके.तसेच सर्व व्यापारी प्रतिनिधी उपस्थित होते.

# द्या एक हात मदतीचा उपक्रमास चेंबूरच्या मुस्कान फाउंडेशनची साथ

**पाली : प्रतिनिधी**

आदिवासी मुलांच्या शिक्षणाला खाकी वर्दीचा आधार या शिर्षकाखाली पोलीस हवालदार राजेंद्र वाघमारे यांच्या समाजपयोगी कार्याचा आढावा प्रकाशित करण्यात आला होता. ते पाहुन चेंबूर मुंबईचे महेश अंबेकर यांनी त्यांचे मित्र सुधागड पालीचे उल्हास लांगी यांच्याशी विचारणा करून खात्री करून घेवून पोलीस हवालदार राजेंद्र वाघमारे यांच्याशी संपर्क साधून हातोंड शाळेचे मुख्याध्यापक अजितसिंह पाटील यांचेशी संपर्क साधला आणि चेंबूर मुंबई येथील महिला मंडळ मुस्कान फाउंडेशन यांनी द्या एक हात मदतीचा या उपक्रमास साथ दिली.



शाळेला एक स्टील कपाट, एक सुंदर टेबल, मुलांना ब्लँकेट, टॉवेल, साबण, खाऊ तसेच क्रीडा व शैक्षणिक साहित्य देवून मुस्कान फाउंडेशनने समाजाप्रती सामाजिक बांधिलकी जोपासली आहे.

मुलांनी उपस्थित महिलांना मिठी मारून जणू काही आपली सर्वस्वी काळजी घेणारे मातृत्वाचे आशीर्वादाचे हात आपल्या पाठीवर फिरले असे मन हेलावणारे डोळ्यात भरणारे चित्र दिसून आले. मुख्याध्यापक अजितसिंह पाटील यांनी शाळेची माहिती आणि मुलांच्या अडचणी व सामाजिक व्यवस्था मांडली. सहशिक्षक योगेश भांड आणि अंकुश काकरा यांनी योग्य नियोजन केले.

मुस्कान फाउंडेशनच्यावतीने रेणुका पुजारी, ज्योती हंकारे, करुणा लालगे, सोनाली पुजारी, वैशाली मैराले, प्रांजली कोलारकर, पूर्वा आंबेकर यांचे योगदान व सहकार्य लाभले. हातोंड्या ग्रामसेविका ज्योती मदने, सुनंदा वाघमारे, अर्चना वाघमारे, रघुनाथ वाघमारे यांची उपस्थिती होती.

# आदर्शच्या संचालकपदी संजय राऊत नियुक्त

**अलिबाग: प्रतिनिधी**

अलिबागमधील प्रतिथयश चार्टर्ड अकाऊंटट संजय राऊत व नागाव येथील डॉ. मकरंद आठवले यांची आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेच्या तज्ञ संचालकपदी निवड करण्यात आली.



आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेच्या नवीन कार्यकारिणीची पहिली सभा नवनिर्वाचित अध्यक्ष अभिजित पाटील यांच्या अध्यक्षतेखाली दि. ३० डिसेंबर २०२२ रोजी झाली. या सभेत श्री.संजय राऊत व डॉ. मकरंद आठवले यांची तज्ञ संचालक म्हणून एकमताने निवड करण्यात आली.

आदर्शचे नवनिर्वाचित अध्यक्ष अभिजित पाटील, संस्थापक सुरेश पाटील व सर्व संचालकांनी दोन्ही तज्ञ संचालकांचे अभिनंदन करून आदर्श परिवारात स्वागत केले.

# मेढा येथील स्नेहसंमेलनात विविध उपक्रमांचे उद्घाटन

**रोहे : प्रतीनिधी**

को.ऐ.सो.मेढे विभाग इंग्रजी शाळा मेढे येथे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण सोहळा मोठ्या उत्साहात करण्यात आला. १६ डिसेंबर २०२२ रोजी सकाळी साडेआठ वाजता क्रीडा वस्तूंचे उद्घाटन अरुण खामकर तर श्रमदान शिबिराचे उद्घाटन विलास खांडेकर यांच्या हस्ते करण्यात आले.

१८ डिसेंबर रोजी को.ए.सो. वर्धापन दिन साजरा करण्यात आला असून सकाळी साडेसात वाजता शाळा समिती सभापती लक्ष्मण महाले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. २३ डिसेंबर रोजी सकाळी साडेनऊ वाजता स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ प्रमुख अतिथी संजय सपाते व हशीराम मंचेकर यांच्या हस्ते विज्ञान व चित्रकला प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. आनंदीबाई प्रधान महाविद्यालय नागोठण्याच्या मुख्याध्यापिका नीलम विकास महाले व राजीप रेवली शाळा मुख्याध्यापिका मनीषा उदय मोरे यांच्या हस्ते रांगोळी प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमास नितीन ठमके, विलास महाले हे उपस्थित होते. याप्रसंगी प्रदीप महाले,सौरभ खांडेकर,संजय शेलार आजी–माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष चेअरमन लक्ष्मण महाले, शाळा समिती सदस्य दीपक दाइटकर, माजी शिक्षक प्रदीप जोशी आदी उपस्थित होते

या कार्यक्रमात लक्ष्मण महाले यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक रवींद्र पाटील यांनी तर उपकार्याध्यक्ष माणिक गायकवाड यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले. सूत्रसंचालन श्याम म्हात्रे तर आभार प्रदर्शन स्नेहसंमेलन कार्याध्यक्ष दत्ताराम म्हात्रे यांनी केले.

# नववर्षात श्रीलंकेविरुद्ध सलामीची लढत

## आज पहिला टी-२० सामना; युवा टीम इंडिया सज्ज

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघ नववर्षातील आपल्या अभियानाची सुरुवात श्रीलंकेविरुद्धच्या मायदेशातील मालिकेतून करणार आहे. भारत आणि श्रीलंका यांच्यात तीन ट्वेन्टी-२० आणि तीन वनडे सामने खेळवले जाणार आहेत. आगामी मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा झाली असून टी-२० मालिकेसाठी भारतीय संघात युवा खेळाडूंना संधी देण्यात आली आहे. या मालिकेतील पहिला टी-२० सामना मुंबईत मंगळवारी (दि. ३) रंगणार आहे.

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) आगामी वनडे विश्वचषकाच्या पार्श्वभूमीवर वरिष्ठ खेळाडूंना टी-२० मालिकेतून विश्रांती दिली आहे. रोहित शर्मा शर्मा आणि विराट कोहली हे टी-२० मालिकेचा हिस्सा नसणार आहेत. रोहित बोटाच्या दुखापतीतून सावरल्यानंतर त्याच्या खांद्यावर वनडे मालिकेची जबाबदारी सोपविण्यात आली आहे, तर हार्दिक



पांड्याच्या नेतृत्वात भारतीय संघ आशियाई किंग्जचा सामना करण्यासाठी सज्ज झाला आहे.

सूत्रांनुसार श्रीलंकेविरुद्धच्या पहिल्या ट्वेंटी-२० सामन्यात युझवेंद्र चहल आणि अक्षर पटेल यांना वगळून कुलदीप यादवला स्थान दिले जाणार आहे. प्लेइंग इलेव्हनमध्ये वॉशिंग्टन सुंदर, अक्षर पटेल, कुलदीप यादव आणि युझवेंद्र चहल यांच्यात रस्सीखेच असेल, कारण भारतीय संघ दोन रिस्ट-स्पिनर्ससह जाण्याची शक्यता फारच कमी आहे. अष्टपैलू खेळाडूसाठी वॉशिंग्टन सुंदर हा अक्षर पटेलला मागे टाकून संघात जागा मिळवू शकतो. पॉवरप्लेमध्ये गोलंदाजी करण्याची सुंदरची क्षमता त्याची जमेची बाजू ठरू शकते.

शुबमन गिलने भारतीय संघाकडून १३ कसोटी आणि १५ वन डे सामने खेळले आहेत, परंतु हा सलामीवीर फलंदाज अद्याप भारतासाठी टी-२०मध्ये पदार्पण करू शकला नाही. त्याने गुजरात टायटन्सच्या पहिल्या आयपीएल हंगामात ४८३ धावा करून विजयात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती, परंतु तरीही त्याला सर्वांत लहान स्वरूपात संधी देण्यात आली नाही. गुजरातचा कर्णधार हार्दिक पांड्यासोबत तो वानखेडेवर ईशान किशनसोबत सलामीला उतरू शकतो.

**भारताचा टी-२० संघ :** हार्दिक पांड्या (कर्णधार), ईशान किशन (यष्टीरक्षक), ऋतुराज गायकवाड, शुबमन गिल, सूर्यकुमार यादव (उपकर्णधार), दीपक हुडा, राहुल त्रिपाठी, संजू सॅमसन, वॉशिंग्टन सुंदर, युझवेंद्र चहल, अक्षर पटेल, अर्शदीप सिंग, हर्षल पटेल, उमरान मलिक, शिवम मावी, मुकेश कुमार.

# आजपासून मुंबईत राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा

**मुंबई : प्रतिनिधी**

बंड्या मारुती सेवा मंडळाच्या वतीने महाराष्ट्र राज्य व मुंबई शहर कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने ३ ते ६ जानेवारी या कालावधीत स्थानिक पुरुष व महिला गट कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ना. म. जोशी मार्ग येथील श्रमिक जिमखाना येथे ही स्पर्धा खेळली जाईल.



या स्पर्धेत विजय क्लब, अमर क्रीडा मंडळ, नवोदित संघ, अंकुर स्पोर्ट्स, गुड मॉर्निंग, गोलफादेवी सेवा, विजय नवनाथ, जय भारत, लायन्स स्पोर्ट्स (सर्व मुंबई शहर), अंबिका, उत्कर्ष, स्वस्तिक, सत्यम (सर्व मुंबई उपनगर), मोरया, उजाळा, मावळी, शिवशंकर (सर्व ठाणे), बाबुराव चांदेरे सोशल फौंडेशन, राकेश घुले मित्र मंडळ, चेतक (सर्व पुणे), बाबुराव चांदेरे सोशल फौंडेशन नांदेड, वाघजाई क्रीडा, कोळकेवाडी मंडळ (रत्नागिरी), मिडलाईन रायगड आदी संघांत पुरुष गटात चुरस पहावयास मिळेल, तर महिला गटात, शिवशक्ती, डॉ. शिरोडकर, मुंबई पोलीस, विश्वशांती, स्वामी समर्थ (सर्व मुंबई), महात्मा गांधी (उपनगर), ज्ञानशक्ती, होतकरू, राजर्षी शाहू (सर्व ठाणे), इच्छाशक्ती (पालघर) आदी १२ संघ एकमेकांसमोर उभे ठाकणार आहेत.

सर्व सामने सायंकाळच्या सत्रात विद्युतझोतात होतील. पुरुषांत अंतिम विजयी संघास चषक व एक लाख रुपये प्रदान करण्यात येतील. उपविजयी संघास चषक व ६५ हजार रुपये देण्यात येतील. उपांत्य उपविजयी दोन्ही संघांना प्रत्येकी चषक व २५ हजार रुपये देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. स्पर्धेत सर्वोत्तम ठरणाऱ्या खेळाडूस २५ हजार, उत्कृष्ट चढाई व पकडीचा खेळाडूस प्रत्येकी १५ हजार देण्यात येणार आहेत. त्याचबरोबर महिलांत विजयी होणाऱ्या संघाना चषक व ६५ हजार रुपये प्रदान करण्यात येतील. उपविजयी संघास चषक व ४५ हजार देऊन सन्मानित करण्यात येईल, तर उपांत्य उपविजयी दोन्ही संघांना प्रत्येकी चषक व १५ हजार रुपये देण्यात येतील. स्पर्धेत सर्वोत्तम ठरणाऱ्या महिला खेळाडूस १५ हजार रुपये, सर्वोत्तम चढाई व पकडीच्या खेळाडूस प्रत्येकी १० हजार रुपये प्रदान करण्यात येतील. प्रतिदिनीचा मानकरी ठरणाऱ्या दोन्ही गटांतील खेळाडूस सायकल प्रदान करण्यात येईल.

# कळमजे येथे क्रिकेट स्पर्धा

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील श्री शिव छत्रपती ग्रामीण टेनिस क्रिकेट



(छाया : सलीम शेख)

असोसिएशनच्या सौजन्याने शिवगर्जना क्रिकेट क्लब कळमजे यांनी जावळीच्या मैदानावर क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते पंकज तांबे यांच्या हस्ते झाले.

उद्घाटन समारंभास असोसिएशनचे कार्याध्यक्ष शशिकांत वाढवळ, संस्थापक सुजित वाढवळ, स्वराज्य संघटनेचे पदाधिकारी स्वप्नील शिर्के, संभाजी गायकवाड, असोसिएशनचे पदाधिकारी समीर सकपाळ, संजय शिंदे, शैलेश शिंदे, अभिजित जाधव, अभिजित तेटगुरे, प्रतीक पाटील, संजू धामणे, मिलिंद शिर्के, शिव गर्जना क्रिकेट क्लबचे कर्णधार अमोल वाढवळ, उपकर्णधार राहुल जाधव आदींसह क्रिकेटप्रेमी व खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बॅडमिंटन निवड चाचणी स्पर्धेतून सायनाची माघार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



राष्ट्रकुल स्पर्धेतील दोन पदक विजेती बॅडमिंटनपटू सायना नेहवालने आशियाई मिश्र सांघिक अजिंक्यपद स्पर्धेसाठी होणाऱ्या राष्ट्रीय निवड चाचणीतून माघार घेण्याचा निर्णय घेतला आहे. आशियाई स्पर्धा १४ ते १९ फेब्रुवारी या कालावधीत दुबईत होईल.

या स्पर्धेच्या निवड चाचणीसाठी सायनासह आकर्षी काश्यप आणि मालविका बनसोड यांची निवड करण्यात आली होती. आशियाई स्पर्धेत पी. व्ही. सिंधूची आधीच निवड झाली असून दुसऱ्या महिला खेळाडूच्या स्थानासाठी या तिघींची निवड चाचणी रंगणार होती, मात्र या तिघींपैकी सायना व मालविका यांनी माघार घेण्याचा निर्णय घेतला.

# शिवाजीनगर प्रीमियर लीग रंगली

## लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आदेश स्पोर्ट्स शिवाजीनगरच्या वतीने रविवारी (दि. १) आयोजित एकदिवसीय शिवाजीनगर प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धा उत्साहात झाली. या स्पर्धेला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजप रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत खेळाडूंना प्रोत्साहन दिले.

छत्रपती शिवाजी महाराज मैदानात झालेल्या या स्पर्धेत एकूण सहा संघ सहभागी झाले होते. या वेळी भाजप महिला मोर्चा तालुका अध्यक्ष रत्नप्रभा घरत, वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, अरुण घरत, भागिरथी मोकल, नंदा ठाकूर, आशा म्हात्रे, भाऊ कडू, महेंद्र कडू, अमृत ठाकूर, दर्शन ठाकूर, सुजित ठाकूर,



अमित कडू, सुदीप ठाकूर, मयूर ठाकूर, निलेश ठाकूर, शशिकांत कडू, व्ही. के. ठाकूर, दीपक गोंधळी, प्रवीण ठाकूर, प्रभाकर ठाकूर, महेश ठाकूर, निलेश म्हात्रे यांच्यासह खेळाडू आणि क्रिकेटप्रेमी उपस्थित होते. समर्थ इलेव्हन संघाने विजेतेपद पटकाविले.

# पिंच्याक सिलॅट स्पर्धेत पालीतील अनुज सरनाईकची 'सुवर्ण' हॅट्ट्रिक

**पाली : प्रतिनिधी**

दिव-दमण येथे झालेल्या चौथ्या वेस्ट झोन एशियन पिंच्याक सिलॅट चॅम्पियनशीप




स्पर्धेत पालीतील अनुज सरनाईकने तीन सुवर्णपदके पटकाविले. अनुजच्या या यशाने रायगडसह महाराष्ट्र राज्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

या स्पर्धेत वेस्ट झोन अंतर्गत महाराष्ट्र, गोवा, गुजरात, मध्य प्रदेश, राजस्थान आणि दमण आणि दीव या राज्यांमधील तब्बल ३२० खेळाडू सहभागी झाले होते. अनुजने ८५ ते ९० वजनी गट फाईट, तूंगल इव्हेंट व रेगु ग्रुप इव्हेंट अशा तीन फाईट प्रकारांत सुवर्णपदक जिंकले. इंडिया पिंच्याक सिलॅट फेडरेशन राष्ट्रीय अध्यक्ष व अनुजचे मार्गदर्शक किशोर येवले यांच्यासह अनेक मान्यवरांनी अनुजचे अभिनंदन केले.

# प्रीमियर लीग फुटबॉलमध्ये आर्सेनलची ब्रायटनवर मात

**ब्रायटन : वृत्तसंस्था**

इंग्लंडमधील आघाडीचा संघ आर्सेनलने ब्रायटनवर ४-२ अशी मात करीत प्रीमियर लीग फुटबॉलच्या गुणतालिकेतील अग्रस्थानावरील पकड अधिक मजबूत केली आहे.

बुकायो साका (दुसऱ्या मिनिटाला), कर्णधार मार्टिन ओडेगार्ड (३९व्या मि.), एडी एन्केटिया (४७व्या मि.) आणि गॅब्रिएल मार्टिनेली (७१व्या मि.) यांनी केलेल्या गोलच्या जोरावर आर्सेनलला विजय मिळवता आला. हा आर्सेनलचा १६ सामन्यांत १४वा विजय ठरला. त्यामुळे त्यांचे ४३ गुण झाले असून दुसऱ्या स्थानावरील मँचेस्टर सिटीचे १६ सामन्यांत ३६ गुण आहेत. आर्सेनलकडे सात गुणांची आघाडी आहे.

ब्रायटनविरुद्धच्या सामन्यात आर्सेनलने सुरुवातीपासून अप्रतिम खेळ केला. साकाने दुसऱ्याच मिनिटाला गोल करीत आर्सेनलला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर ३९व्या मिनिटाला ओडेगार्डने उत्कृष्ट फटका मारून आर्सेनलची आघाडी दुप्पट केली, तर ४७व्या मिनिटाला एन्केटिनने आर्सेनलसाठी तिसरा गोल केला, मात्र यानंतर ब्रायटनने आपला खेळ उंचावला.




६५व्या मिनिटाला काओरू मिटोमाने ब्रायटनचे गोलचे खाते उघडले, परंतु दुसरीकडे ओडेगार्डच्या पासवर मार्टिनेलीने गोल करीत आर्सेनलला ४-१ अशी आघाडी मिळवून दिली. मग ७७व्या मिनिटाला इव्हान फर्ग्युसनने ब्रायटनसाठी दुसरा गोल केला, परंतु यानंतर आर्सेनलने भक्कम बचाव करताना सामना जिंकला.

अन्य सामन्यात मँचेस्टर सिटीला एव्हर्टनने १-१ अशा बरोबरीत रोखले. तारांकित आघाडीपटू अर्लिंग हालँडने २४व्या मिनिटाला गोल करीत सिटीला १-० अशी आघाडी मिळवून दिली, मात्र ६४व्या मिनिटाला डिमारी ग्रेने केलेल्या गोलमुळे एव्हर्टनला सामन्यात बरोबरी साधण्यात यश आले.

उत्तरार्धात आघाडीपटू मार्कस रॅशफोर्डने केलेल्या गोलच्या जोरावर मँचेस्टर युनायटेडने प्रीमियर लीगच्या सामन्यात वोल्व्हसवर १-० अशी सरशी साधली. सामन्याच्या पूर्वार्धात दोन्ही संघांना गोल करण्यात अपयश आले. उत्तरार्धात युनायटेडने राखीव फळीतून रॅशफोर्डला मैदानावर उतरवले आणि त्याने निर्णायक गोलची नोंद केली. सामन्यापूर्वी संघाच्या बैठकीला वेळेवर हजर न राहिल्यामुळे रॅशफोर्डवर युनायटेडचे प्रशिक्षक एरिक टॅन हाग यांनी कारवाई केली होती. त्यांनी रॅशफोर्डला सामन्याच्या सुरुवातीला राखीव खेळाडूंमध्ये बसवले. सामन्यानंतर रॅशफोर्डने आपली चूक मान्य केली.

# बिग बॅश लीगमध्ये खेळाडूने टिपला अफलातून झेल



**द गाब्बा : वृत्तसंस्था**

बिग बॅश लीगमध्ये सिडनी सिक्सर्स आणि ब्रिस्बेन हीट या संघांमध्ये रविवारी (दि. १) सामना रंगला. द गाब्बा येथे रंगलेल्या या सामन्यात एक अफलातून व तितकाच बुचकळ्यात टाकणारा झेल मायकेल नेसरने घेतला. हाच झेल आता जगभरातील क्रिकेट प्रेक्षकांच्या वादाचा मुद्दा ठरत आहे.

सिडनी सिक्सर्ससमोर २२५ असताना जॉर्डन सिल्कची तुफान फटकेबाजी सुरू होती. अशा वेळी जॉर्डनला बाद करण्याची एक सुवर्णसंधी ब्रिस्बेनच्या मायकेल नेसरला गवसली. नेसरनेसुद्धा या संधीचे सोने करण्यासाठी अत्यंत जिगरबाज कृती केली. शेवटच्या षटकात मार्क स्टीकेटीच्या गोलंदाजीवर जॉर्डन सिल्कने चेंडू हवेत भिरकावला. लाँग-ऑफ बाऊंड्रीजवळ क्षेत्ररक्षण करणाऱ्या नेसररने लाईनच्या अगदी थोडक्यात आधी हा चेंडू हवेतच झेलला, पण इथे आपला तोल जाणार हे लक्षात आल्याने नेसरने चेंडू पुन्हा हवेत फेकून मग तोल सांभाळून पकडण्याचा प्रयत्न केला, पण मुळात जेव्हा नेसरने झेल पकडला तेव्हा तो आणि चेंडू दोघेही सीमारेषेच्या बाहेर होते. हे पाहून पुन्हा त्याने चेंडू आत फेकला आणि मग सीमारेषेच्या आत जाऊन झेल पकडला.

थर्ड अंपायरनुसार सिल्कला बाद देण्यात आले. थर्ड अंपायरने बाद दिल्यावर २३ चेंडूंत ४१ धावा करून सिल्क माघारी परतला. त्याने दोन षटकार आणि तीन चौकारांसह ४१ धावा केल्या. त्यांचा संघ निर्धारित २० षटकांत २०९ धावा करू शकला आणि ब्रिस्बेन हीटने हा सामना जिंकला.

# मिशन वर्ल्डकपसाठी बीसीसीआयकडून २० खेळाडूंची निवड

## वेगवेगळ्या मालिकांमध्ये आलटून पालटून मिळणार संधी

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) टी-२० विश्वचषकातील खराब कामगिरी आणि आगामी स्पर्धांच्या रोडमॅपबाबत रविवारी बैठक घेतली. या बैठकीत अनेक गोष्टी समोर आल्या. त्यापैकी एक म्हणजे बीसीसीआयने एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेसाठी पहिली पसंती म्हणून २० नावांची निवड केली आहे. ही २० नावे वेगवेगळ्या मालिकांमध्ये फिरवली जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

बीसीसीआयच्या बैठकीत अनेक मुद्द्यांवर चर्चा झाली, ज्यामध्ये एकदिवसीय विश्वचषक स्पर्धा हाही एक विषय होता. ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या विश्वचषकासाठी बीसीसीआयने २० खेळाडूंची निवड केली आहे. हे सर्व २० खेळाडू पुढील ३५ एकदिवसीय सामन्यांमध्ये फिरत राहतील. बीसीसीआयने अद्याप या २० निवडलेल्या खेळाडूंची नावे जाहीर



केलेली नाहीत, परंतु बोर्डाकडून लवकरच याबाबत अधिकृत घोषणा केली जाऊ शकते.

बीसीसीआयने या २० नावांची घोषणा केली नसली तरी यानंतर क्रिकेट तज्ज्ञांचे मतही समोर येत असून ते त्यांच्या आवडत्या २० खेळाडूंची नावे देत आहेत. या एपिसोडमधील पहिले नाव आहे समालोचक आणि क्रिकेट तज्ज्ञ हर्षा भोगले यांचे आहे. त्यांनी ट्विट करून लिहिले आहे, मला वाटते की, ही मुख्य टीम आहे ज्यासोबत निवडकर्ते आणि संघ व्यवस्थापन काम करतील. यामध्ये रोहित शर्मा, केएल राहुल, शुबमन गिल, विराट कोहली, श्रेयस अय्यर, इशान किशन, ऋषभ पंत, सूर्यकुमार यादव, संजू सॅमसन, हार्दिक पांड्या, अक्षर पटेल, रवींद्र जडेजा, वॉशिंग्टन सुंदर, कुलदीप यादव, युजवेंद्र चहल, जसप्रीत बुमराह, मोहम्मद शमी, अर्शदीप सिंग, प्रसिद्ध कृष्णा, मोहम्मद सिराज आणि शार्दुल ठाकूर २१वा आहे, तसेच पुढील दोन निवडक खेळाडू रजत पाटीदार आणि उमरान मलिक आहेत.

हर्षा भोगले व्यतिरिक्त अनेक सोशल मीडिया वापरकर्त्यांनीदेखील त्यांच्या आवडत्या खेळाडूंचा उल्लेख केला आहे. ज्या संघांची निवड केली जात आहे. त्यात तज्ज्ञांपासून चाहत्यांपर्यंत अनेक नावे आहेत. यामध्ये कर्णधार रोहित शर्मा, विराट कोहली, केएल राहुल, श्रेयस अय्यर, सूर्यकुमार यादव, जसप्रीत बुमराह, रवींद्र जडेजा, इशान किशन यांचा समावेश आहे. ऋतुराज गायकवाड, शार्दुल ठाकूर, आर. अश्विन, रवी बिश्नोई यांच्याबाबत मतभेद आहेत.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com